दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-८२ | शुक्रवार दि.१२ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महाराष्ट्रात आर्थिक शिस्तीचे धिंडवडे !

अवघ्या दोन-अडीच महिन्यांत राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होणार आहे. या निवडणुकीतही राज्यातील मतदारांचा रोष सहन करावा लागण्याच्या वा पराभवाच्या धास्तीने महायुती सरकारने अवघ्या काही दिवसांपूर्वी सादर केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात राज्यातील विविध समाज घटकांना खुश करण्यासाठीच्या योजनांची खैरात केली होती.

### अतिवृष्टीमुळे गैरहजर उमेदवारांकरिता उद्या टंकलेखन कौशल्य चाचणी

मुंबईः महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे ८ जुलै २०२४ रोजी आयोजित मराठी व इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी अतिवृष्टीमुळे अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांकरिता मराठी व इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणी आता १३ जुलै, २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. ८ जुलै, २०२४ रोजी मुंबई परिसरात अतिवृष्टी झाल्याने वाहतुकीच्या साधनांवर परिणाम झाला होता. परिणामी या दिवशी चाचणीसाठी उमेदवारांना उपस्थित राहता यावे याकरिता चारही सत्रांची कौशल्य चाचणी ही नियोजित वेळेपेक्षा ४५ मिनिटे उशिराने सुरु करण्याचा निर्णय आयोगाने घेतला होता. तरीही अतिवृष्टीमुळे अनेक उमेदवारांना चाचणीसाठी उपस्थित राहता आले नाही.

# संपूर्ण कर्जमुक्ती देऊन थकित वीज बील माफ करा !

## ● शेतकऱ्यांच्या मुद्यावरून विरोधकांचा सरकारवर हल्लाबोल

**मुंबई । प्रतिनिधी**

**केंद्र आणि राज्य सरकारच्या नो गॅरंटी कारभारामुळे राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. निसर्गाची अवकृपा आणि सरकारकडून होणारी फसवणूक यामुळे शेतकरी पिळवटून निघाला आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्येत वाढ होत आहे. देशातील एकूण आत्महत्यांपैकी ३० टक्के आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत. हे भूषणावह नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील तर सरकारने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती देऊन त्यांचे थकित वीज बिल माफ करावे, अशी मागणी विधासभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली.**

सत्ताधाऱ्यांच्या २९३ अन्वये प्रस्तावावर बोलताना वडेट्टीवार यांनी गुरूवारी (दि.११) विधानसभेत सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांची पोलखोल केली. वडेट्टीवार म्हणाले की, नैसर्गिक संकटं शेतकऱ्याच्या पाचवीला पुजली आहेत त्यात आता सरकार पुरस्कृत संकट उभी केली जात आहेत. निर्यात बंदी, शेतमालाला भाव नाही, हमीभाव नाही, वाढता कर्जाचा बोजा, पीकविमा कंपन्यांकडून होणारी फसवणूक, खते, बियाणे,



### शेतकरी योजनांचा बोजवारा...

*छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, महात्मा जोतीबा फुले कर्जमाफी योजनांचा देखील बोजवार उडाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज कृषी योजना २०२३-२४ अंतर्गत मागेल त्याला ठिबक सिंचन, फळबाग, शेततळे, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर या घटकांची सेवा शेतकऱ्यांना पुरवली जाते परंतू योजनेप्रमाणे अर्ज केलेल्या शेतकऱ्यांपैकी किती शेतकऱ्यांना याचा प्रत्यक्षात लाभ झाला? हा देखील प्रश्नच आहे असे वडेट्टीवार म्हणाले.*

शेती अवजारे यांचे वाढलेले दर, तसेच महागाईने उच्चांक गाठला आहे त्यामुळे तुमच्या सहा हजार रूपये मदतीचा उपयोग होत नाही. बैल गेला आणि झोपा केला अशी य ◀◀ पान २ वर

## || थोडक्यात

### पंतप्रधान उद्या मुंबई दौऱ्यावर


मुंबईः पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या म्हणजेच १३ जुलैला मुंबईत येत असून त्यांच्या हस्ते महापालिकेच्या काही महत्त्वाच्या प्रकल्पांचे भूमिपूजन होणार आहे. मुंबई महानगरपालिकेच्या गोरेगाव - मुलुंड जोडरस्ता प्रकल्पातील जुळ्या बोगद्याचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून हा बोगदा जात आहे. शनिवारी, १३ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता हा भूमिपूजन कार्यक्रम होणार आहे. गोरेगाव येथील नेस्को एक्झिबिशन सेंटरमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महानगरपालिका प्रशासनाने त्यादृष्टीने तयारी सुरू केली आहे.

### मुसळधार पावसाचा इशारा

पुणेः कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात पुढील ४ दिवस पावसाचे राहणार आहेत. १२ ते १५ जुलै दरम्यान कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या किनारी भागांत मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. दरम्यान, पालघर, सिंधुदुर्ग, नाशिक, कोल्हापूरमध्ये शुक्रवारी जोरदार पावसाची शक्यता असल्याने यलो अलर्ट जारी केला आहे. उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या घाट भागात मुसळधार तसेच विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, वाऱ्यासह मध्यम पाऊस पडणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

# यांची एकदा जिरवलीय, पुन्हा जिरवणार

## मनोज जरांगे यांचा मुंडे बहिण-भावावर हल्लाबोल; बीडमध्ये मराठ्यांना विरोध करणाऱ्या सगळ्यांना पाडा





**बीड । प्रतिनिधी**

**मला अडाणी म्हणणाऱ्या छगन भुजबळांना कसा खुट्टा ठोकला हे त्यांना माहिती आहे, गोरगरीब मराठ्यांना त्रास देऊ नका, यांची एकदा जिरवली आहे, पुन्हा जिरवणार असल्याचे सांगत मुंडे बहिण-भावावर मनोज जरांगे यांनी बीडमधील शांतता रॅलीमध्ये हल्लाबोल केला. बीड जिल्ह्यात मराठ्यांना त्रास देणाऱ्या सगळ्यांना पाडा, असे आवाहन त्यांनी समाज बांधवांना केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करण्याचा शब्द दिला होता, १३ तारखेपर्यंत त्याची अमलबजावणी केली नाहीतर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिला.**

मराठा आंदोलक मनोज जरांगे हे सध्या ◀◀ पान २ वर

### » मनोज जरांगे यांच्या भाषणातील दहा मुद्दे

*» १. आता जर आरक्षण नाही मिळाले तर पुढच्या २०-२५ पिढ्या वाया जातील. आमच्या वेदना तुम्हाला समजणार नाहीत, आत्महत्या केलेल्या घरात जाऊन एकदा बघा. मरण काय असते आणि घरावर काय संकट असतं हे आम्ही पाहिले आहे. तुम्ही फक्त मराठ्यांची चेष्ठा केली आहे.*

*» २. जर ओबीसी नेत्यांना त्यांच्या जातीचा गर्व असेल तर मलाही माझ्या जातीचा गर्व आहे. कुणावर जर अन्याय होत असेल तर बघ्याची भूमिका घेऊ नका, वेळ सगळ्यावर येते. गरीबांनी गरीबांना साथ द्यावी, श्रीमंत मराठे आपल्या मदतीला येणार नाहीत.*

*» ३. यांना त्यांच्या जातीची मस्ती आहे, त्यांची लोकसभेला जिरवलीय, विधानसभेलाही पुन्हा एकदा जिरवायची. मराठ्यांचे नुकसान करणाऱ्यांना माफ करायचे नाही. मराठ्यांना विरोध करणारा मराठा असला तरी त्याला विरोध करायचा, त्याला सत्तेत जाऊ द्यायचे नाही.*

*» ४. सरकारने मराठा आरक्षण दिले नाही तर मी नाव घेऊन सांगणार, यांना पाडा. आपण कुणीही उमेदवार देऊ, त्याला साथ द्यायची. मतदान १०० टक्के करायचे.*

*» ५. आमचा विरोध फक्त छगन भुजबळांना आहे. कारण त्यांनीच मराठा आरक्षणाला विरोध केला. बाकी कुणाला विरोध नाही. मराठ्यांच्या नोंदीसुद्धा रद्द करा अशी त्यांची मागणी आहे. त्यांना साथ द्यायची नाही, त्यांना पाडायचंच. धनगर समाजाला मराठा आरक्षणामुळे कोणताही धोका नाही. फक्त छगन भुजबळ सांगतात म्हणून यांचे नेते आपल्याला विरोध करतात.*

*» ६. सरकारच्या बाजूने जाऊन वाटोळे करू नका. निवडणुकीत हार जीत होत असते. एकदा पराभव झाल्यावर माझ्या समाजाला तुम्ही जातीयवादी ठरवताय. मराठा कधीही जातीयवादी नव्हता, हे ओबीसी नेते सगळे एकत्र झाले.*

*» ७.आपल्या ठरलेल्या सगेसोयऱ्यांच्या मागणीची तातडीने अंमलबजावणी करा. सुरूवातीला ओबीसींच्या यादीत फक्त १८० जाती होत्या, नंतर त्यामध्ये पोटजाती म्हणून ४५० च्या वर जाती वाढल्या. मग कुणबी ही मराठ्यांची पोटजात म्हणुन त्यामध्ये का समावेश करत नाही.*

*» ८.आमचीही स्वप्न आहेत, आम्हालाही आरक्षण हवंय. कुणाला काय डाव टाकायचे ते टाकू द्या, आम्हाला आरक्षण पाहिजे. आम्ही काय नवीन मागत नाही, जे वाशीमध्ये ठरलं होतं तेच द्या. सगेसोयऱ्यांच्या मागणीची अंमलबजावणी करा*

*» ९. आमच्या हक्काचं आरक्षण द्या. महाविकास आणि महायुतीवाले एकच आहेत असं दिसतंय. महाविकास वाले बैठकीला गेले नाहीत म्हणून महायुतीवाल्यांनी आरक्षणावर निर्णय घेतला नाही. त्यांना कोण अडवले होते?*

*» १०. जातीय दंगली झाल्या पाहिजेत अशी सरकारची इच्छा आहे. सरकारला भुजबळांच्या माध्यमातून जातीय दंगली घडवायच्या आहेत*

# विधान परिषद निवडणुकीत फोडाफोडी अटळ!

## आज मतदान; काँग्रेसची मते फुटणार, ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात

**मुंबई । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीनंतर विधान परिषदेच्या ११ जागांसाठी दि. १२ जुलै रोजी मतदान होणार असून या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात घोडेबाजार होणार असल्याचे संकेत आहेत. तर काँग्रेसचे ३ ते ४ मते फुटणार असल्याचे म्हटले जात आहे. तसे झाले तर भाजपचे ९ उमेदवार विजयी होतील, असा अंदाज आहे. महायुती झटका देणार की महाविकास आघाडी लोकसभेतील दबदबा कायम ठेवणार याची चर्चा रंगली आहे.**

विधान परिषदेच्या ११ जागांसाठी दि. १२ जुलै रोजी मतदान पार पडणार आहे. ११ जागांसाठी १२ उमेदवार असल्याने एका उमेदवाराचा पराभव होणार हे निश्चित आहे.



महायुतीसह महाविकास आघाडीने आपापली ताकद पणाला लावली आहे. आघाडीची मते फुटली नाही तर भाजपचा एक उमेदवार पराभूत होईल, जर मते फुटली तर मिलिंद नार्वेकर किंवा भाई जयंत पाटील यांचा पराभव होऊ शकतो, असे म्हटले जात आहे. १२ वा उमेदवार कोणाचे बारा वाजवणार याची चर्चा रंगली असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून पाठिंबा असलेले उमेदवार तथा शेतकरी कामगार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी थेट काँग्रेसचे तीन ते ◀◀ पान २ वर

### काँग्रेसचे ते चार आमदार कोण?

दरम्यान, काँग्रेसचे तीन ते चार आमदार क्रॉस करणार असल्याचा शेकापचे जयंत पाटील यांनी केल्यानंतर ते आमदार कोण? याचीच चर्चा रंगली आहे. ही चचा नांदेड जिल्ह्यातील लक्ष गेलं आहे. ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काही महिन्यांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. मात्र, लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपला नांदेडमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे आता खासदारकी मिळाल्याने अशोक चव्हाण यांना आता समर्थक आमदारांची कोणत्याही परिस्थितीत मते दबाव असल्याची चर्चा आहे. त्यामुळे जयंत पाटील यांच्या निशाण्यावर अशोक चव्हाण आमदार तर नाहीत ना? अशी चर्चा आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील अशोक चव्हाण समर्थक आमदार माधवराव पाटील मोहन अण्णा आणि जितेंद्र हे आमदार भाजपला मतदान करतील, अशी चर्चा आहे.

# आता नवा नारा, अबकी बार २२५ पार

## » विधानसभा निवडणुकीबाबत पवारांचे भाकित

**मुंबई । प्रतिनिधी**

**पुढील दोन ते तीन महिन्यांमध्ये विधानसभेची निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. राज्यात राजकीय घडामोडींना देखील वेग आलाय. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी गुरुवारी मोठे विधान केले आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी २२५ जागा जिंकेल असे भाकित केले आहे. राष्ट्रवादीचे नेते देखील त्यांच्या मतदारसंघाचा आढावा घेत आहेत.**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेल्या यशानंतर कार्यकर्ते



मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटामध्ये प्रवेश करत ◀◀ पान २ वर

### » महाराष्ट्र चुकीच्या लोकांच्या हाती

*लोकसभा निवडणुकीत जनतेने महाविकास आघाडीला मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिलाय. महाराष्ट्र चुकीच्या लोकांच्या हातात आहे. महाराष्ट्रात ४८ खासदार आहेत. ५ वर्षांपूर्वी जी निवडणूक झाली त्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रात विरोधकांचे ६ खासदार निवडणूक आले होते. त्यामध्ये ४ राष्ट्रवादीचे होते. मात्र, गेल्या पाच वर्षातील सत्ताधाऱ्यांच्या कामाचा जो अनुभव आला तो लोकांना चांगला वाटला नाही. असे शरद पवार यांनी म्हटले आहे.*

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.५० क्विंटल | २,२९० | २,२९० | २,२९० |
| ज्वारी/हायब्रिड : ४.५० क्विंटल | २,२५० | २,४०० | २,३०६ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : ११.५० क्विंटल | ८,००० | १०,७०१ | ९,८०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ७,०५१ | ७,०५१ | ७,०५१ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,६४७ | २,६४७ | २,६४७ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ८४.०० क्विंटल | ४,४०० | ४,५२५ | ४,४७० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,२५१ | ६,२५१ | ६,२५१ |



# स्मार्ट मीटर विरोधात असंतोष

## खा.वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वात मुंबईत काँग्रेसचा मोर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

स्मार्ट मीटर रद्द केले पाहिजेत अशी मागणी करत काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाडांच्या नेतृत्वाखाली मोठा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चासंबंधी काँग्रेसकडून दोन दिवसांपूर्वी परवानगी मागितली होती. मात्र सुरक्षेच्या कारणास्तव पोलिसांनी या मोर्चाला ◀◀ पान २ वर

### सर्वसामान्यांच्या खिशाला झळ

काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या की, स्मार्ट मीटरमुळे सर्वसामान्यांना मोठ्या प्रमाणात वीज बील येत आहे. सर्वसामान्यांना ते परडवत नाही. या वाढलेल्या विजेच्या बिलाविरोधात आम्ही मोर्चा काढणार होतो. पण उद्योगपतींना पाठिंबा देणाऱ्या या सरकारने आणि पोलिस यंत्रणेने आमच्या मोर्चाला परवानगी नाकारली. विजेचे बील कमी झाले पाहिजे, स्मार्ट मीटर रद्द झाली पाहिजेत. राज्य सरकारला मध्यमवर्गीयांचा आवाज ऐकू येत नाही, असे त्या म्हणाल्या.

### मोदींच्या बॅनरवर चिखलबाजी

स्मार्ट मीटर विरोधात काँग्रेसने केलेल्या आंदोलनादरम्यान वांद्रे बीकेसी परिसरामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वागतासाठी लागलेल्या बॅनरवर काँग्रेस कार्यकर्त्यांनी चिखल फासला. या आंदोलनाच्या दरम्यान काँग्रेस कार्यकर्ते हे आक्रमक झाल्याचे दिसून आले. त्यानंतर चिखल फासण्यात आलेले नरेंद्र मोदींचे बॅनर पोलिसांनी काढून टाकले.

## अग्रलेख

# महाराष्ट्रात आर्थिक शिस्तीचे धिंडवडे !

अवघ्या दोन-अडीच महिन्यांत राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होणार आहे. या निवडणुकीतही राज्यातील मतदारांचा रोष सहन करावा लागण्याच्या वा पराभवाच्या धास्तीने महायुती सरकारने अवघ्या काही दिवसांपूर्वी सादर केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात राज्यातील विविध समाज घटकांना खुश करण्यासाठीच्या योजनांची खैरात केली होती. मात्र, त्यानेही वातावरण बदलेल की नाही, अशीच धास्ती सत्ताधाऱ्यांना वाटत असावी, त्यामुळे अतिरिक्त अर्थसंकल्प मांडून काही दिवसही उलटत नाहीत तोच सगळे निकष व संकेत अक्षरश: धाब्यावर बसवत उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी आजवरच्या इतिहासातील विक्रमी ठरलेल्या सुमारे ९५ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विधिमंडळात मंगळवारी सादर केल्या.

एकूण अर्थसंकल्पाच्या रकमेच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक वर्षभरातील पुरवणी मागण्या असू नयेत, असे संकेत असताना त्याकडे साफ दुर्लक्ष करत अतिरिक्त अर्थसंकल्प मंजूर होताच लगेच १५ टक्क्यांपेक्षा जास्त रकमेच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. अर्थातच विधानसभा निवडणुकीवर डोळा ठेवून लोकानुनयी योजनांवर निधींची खैरात करण्यासाठीच या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. सभागृहातील सत्ताधाऱ्यांचे संख्याबळ पाहता विरोधकांनी कितीही विरोध केला तरी या मागण्यांना मंजुरी मिळेल, हेही उघडच आहे. एकंदर लोकसभेत दूध पोळल्यावर विधानसभेत कुठलाच धोका पत्करायचा नाही असेच महायुती सरकारने मनाशी पक्के केलेले दिसते. त्यामुळे राज्याच्या आर्थिक शिस्तीकडे साफ दुर्लक्ष करत सरकारने 'निवडणुकीसाठी होऊ दे खर्च' हेच धोरण अवलंबिल्याचे स्पष्ट होते. अजित पवार यांनी सादर केलेल्या ९४ हजार ८८९ कोटी रुपयांच्या विक्रमी पुरवणी मागण्यांमध्ये अनिवार्य खर्चाच्या १७ हजार ३३४ कोटी रुपयांच्या मागण्या आहेत. उर्वरित ७५ हजार ३९ कोटी रुपयांच्या मागण्या या कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या म्हणजेच सरकारने ज्या लोकानुनयी योजना जाहीर केल्या आहेत त्यासाठीच्या खर्चाच्या आहेत. तर २ हजार ५१५ कोटींच्या मागण्या केंद्रपुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसा उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने आहेत. यात सर्वांत मोठी तरतूद अर्थातच महायुती सरकारला गेमचेंजर वाटणाऱ्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेसाठी आहे. अतिरिक्त अर्थसंकल्पात ही योजना सादर करताना सरकारने त्यासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. या योजनेसाठी वर्षाला ४६ हजार कोटी रुपयांची गरज असताना केवळ १० हजार कोटींची तरतूद केल्याने विरोधकांनी ही योजना केवळ निवडणूक जुमला असल्याची टीका सुरू केली होती. 'लाडकी बहीण'ची शाश्वती नाही, असा सूर विरोधकांनी लावला होता. त्याला सडेतोड उत्तर देताना सरकारने पुरवणी मागण्यांद्वारे या योजनेसाठी तब्बल २५ हजार कोटी रुपये अतिरिक्त निधीची तरतूद केली आहे.

राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प ६ लाख १२ हजार कोटी रुपयांचा असताना ९४ हजार ८८९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. हे प्रमाण १५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. थोडक्यात या सरकारने मतांच्या जोगव्यासाठी वित्तीय शिस्तीला पुरते धाब्यावर बसवले आहे. या निवडणुकीच्या राजकारणात राज्याची वित्तीय तूट प्रचंड वाढत चालली आहे. राज्यातील विरोधकांनी त्यावर कडाडून टीका केली आहे. मात्र, सरकार कल्याणकारी योजनांची ढाल पुढे करून मतांच्या जोगव्याचे राजकारण करत आहे. पंतप्रधान इतर पक्षांनी दिलेल्या अशा आश्वासनांना वा राबविलेल्या योजनांना 'रेवडी राजकारण' म्हणून हिणवतात. मात्र, त्यांचा पक्ष सत्तेत सहभागी असलेल्या महायुती सरकारच्या या 'होऊ दे खर्च' वर मौन बाळगतात हे विशेष. एकंदर या पुरवणी मागण्यांद्वारे राज्यातील महायुतीने विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी सुरू केली आहे, असे स्पष्ट दिसते.

# संयुक्त किसान मोर्चाने केली आंदोलनाची घोषणा; पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेत्यांना निवेदन

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**संयुक्त किसान मोर्चाने पुन्हा एकदा प्रलंबित मागण्यासाठी आंदोलन सुरू करण्याची निर्णय जाहीर केला आहे. संयुक्त किसान मोर्चाने दिल्लीत २०२०-२१ मध्ये तीन कृषी कायद्याच्या विरोधात आंदोलन केले होते. त्यावेळी हमीभाव कायद्यासह कर्जमाफीची मागणी केली होती. परंतु अद्यापही त्यावर केंद्र सरकारने पावले उचलली नाहीत. त्यामुळे संयुक्त किसान मोर्चाकडून पुन्हा आंदोलन पुकारण्यात येणार आहे. संयुक्त किसान मोर्चाने गुरुवारी (दि.११) विविध मागण्यांचे निवेदन पंतप्रधान आणि लोकसभा विरोधी पक्ष नेत्यांना दिले आहे. संयुक्त किसान मोर्चाने सर्वसाधारण सभेनंतर आंदोलनाची घोषणा केली आहे.**



संयुक्त किसान मोर्चाने सांगितले की, ९ डिसेंबर २०२१ रोजी केंद्रीय कृषी विभागाच्या सचिवांनी स्वाक्षरी केलेल्या कराराची अंमलबजावणी करण्याच्या मागणीसाठी संयुक्त किसान मोर्चा पुन्हा आंदोलन करण्याचा निर्णय सर्वसाधारण सभेने घेतला आहे. याशिवाय संयुक्त किसान मोर्चा मागण्यांचे निवेदन सर्व खासदारांना लवकरच पाठवणार आहे. मोर्चाचे शिष्टमंडळ १६, १७ आणि १८ जुलै रोजी खासदारांना प्रत्यक्ष भेटणार आहे. संयुक्त किसान मोर्चाच्या मागण्यांसाठी एनडीए सरकारवर दबाव आणण्याची विनंती त्यांना करणार आहे. तसेच ९ ऑगस्ट रोजी देशभरात निदर्शने करणार आहे. भारत छोडो दिवस कॉर्पोरेटस भारत छोडो दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे, असेही संयुक्त किसान मोर्चाने स्पष्ट केलं आहे. संयुक्त किसान मोर्चाने २०२१ साली तीन कृषी कायद्याच्या विरोधात दंड थोपटून केंद्र सरकारला गुडघे टेकायला लावले होते. दरम्यान, १३ फेब्रुवारी २०२४ पासून संयुक्त किसान मोर्चा (बिगर-राजकीय) हमीभाव कायद्यासह विविध मागण्यांसाठी दिल्ली चलो आंदोलन पुकारले आहे. परंतु हरियाणा सरकारने आंदोलकांना हरियाणा-पंजाबच्या सीमेवर रोखले आहे. हरियाणा, महाराष्ट्र, झारखंड आणि जम्मू काश्मीरमध्ये निवडणूका होऊ घातल्या आहेत. या पार्श्वभूमीवर संयुक्त किसान मोर्चाने कार्यक्रम जाहीर केला आहे.

# राज्य राखीव पोलीस शिपाई भरतीची लेखी परीक्षा १४ जुलै रोजी

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

**समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१४ (भाराब-१), छत्रपती संभाजीनगर या आस्थापनेवर सन २०२२-२३ मध्ये रिक्त असलेल्या १७३ पदासाठी सशस्त्र पोलीस शिपाई भरती प्रक्रिया मैदानी चाचणी १९ जून २०२४ ते ०३ जुलै, २०२४ या कालावधीत घेण्यात आली असून संकेतस्थळावर प्रसिध्द उमेदवारांची सशस्त्र पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा १४ जुलै रोजी होणार असल्याची माहिती सहायक समादेशक रमेश वेठेकर यांनी दिली.**

मैदानी चाचणीमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे महाराष्ट्र सशस्त्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश), नियम-२०१२ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा शारीरिक चाचणीत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार यांची संबंधीत प्रवर्गातील जाहिरातीत नमुद रिक्त पदांच्या अनुषंगाने १:१० याप्रमाणे लेखी परीक्षेसाठी २०१३ उमेदवार पात्र ठरले आहेत. सशस्त्र पोलीस शिपाई लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची सामाजिक व समांतर आरक्षणासह गुणांची यादी www.mahapolice.gov.in, policerecruitment2024.mahait.org, www.maharashtrasrpf.gov.in या संकेतस्थळावर व या घटकाचे मुख्य प्रवेशद्वार येथे सूचना फलकावर उमेदवारांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात आली आहे. उमेदवारांना महाआयटी विभागाकडुन सशस्त्र पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेचे स्वतंत्र प्रवेश पत्र निर्गमित करण्यात आले आहे. सदरची लेखी परीक्षा ही वस्तुनिष्ठ स्वरुपाची असणार आहे. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या उमेदवारांची सशस्त्र पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा १४ जुलै, २०२४ रोजी " महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी " (, ), गेट नंबर.०१ व गेट नंबर.०५, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर शहर येथे ११.०० ते १२.३० वाजेपर्यंतम घेण्यात येणार आहे. परंतु उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर सकाळी ७ वाजता हजर राहणे आवश्यक आहे. लेखी परीक्षेकरीता या कार्यालयाकडुन परीक्षा पॅड व ब्लॅक बॉल पेन पुरविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी लेखी परीक्षेकरीता येतांना सोबत फक्त प्रवेशपत्र (हॉल तिकीट), आवेदन अर्ज, पासपोर्ट साईज छायाचित्र व मुळ आधारकार्ड आणावे. इतर कोणतेही किंमती वस्तु, कॅल्क्युलेटर, स्मार्टवॉच, मोबाईल फोन, हेडफोन, ब्ल्युटुथ- हेडफोन व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु सोबत बाळगु नये, असे सहायक समादेशक रमेश ब. वेठेकर यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

# जैन धर्माच्या चातुर्मास कालावधीमध्ये उघड्यावर मांस विक्री करू नये-जिया बेग

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी शहरांमध्ये जैन श्रावक संघ्याच्यावतीने जैन साधू परमपूज्य अनुप्रेक्षाजी महाराज,परमपूज्य श्रुती प्रभाजी महाराज, परमपूज्य ऋतू प्रभाजी महाराज या तीन सांधवींच्या प्रवेशात चातुर्मासास आज शुक्रवार दि.१३ जुलै रोजी पासुन आरंभ होणार आहे.**

पवित्र असलेल्या आणि भक्तिमय असणाऱ्या चातुर्मास कालावधीमध्ये म्हणजेच पुढील चार महिन्यांसाठी उघड्यावरती मास विक्री करू नये अशी विनंती नगराध्यक्ष जिया बेग यांनी केली आहे. यावेळी बोलताना नगराध्यक्ष जिया बेग म्हणाले,आष्टी शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन जैन धर्मियांच्यावतीने करण्यात येणार असून ज्यामध्ये रात्री जेवणाचा त्याग उपवास, प्रवचन, मार्गदर्शन आदी कार्यक्रमांचा समावेश होणार आहे. या चार महिन्यांच्या कालावधीमध्ये राज्यभरातून भाविक भक्त दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी करतात.आठ वर्षानंतर आष्टी शहरात हा चतुर्मास होत असून यानिमित्त शुक्रवारी सकाळी जैन श्रावक संघाच्यावतीने आष्टी शहरांमध्ये भव्य शोभा यात्रा निघणार आहे. यामध्ये जैन बांधव तसेच शहरातील प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यासाठी या चार महिन्याच्या कालावधीमध्ये सर्व धर्म समभाव अशी भावना मनात ठेवून सर्व मास विक्री करणाऱ्या बांधवांनी उघड्यावरती मांस विक्री करू नये अशी विनंती आष्टी नगरपंचायतचे नगराध्यक्ष जिया बेग यांनी केली आहे


# महिनाभरात भटके विमुक्तांना दाखले द्या

## महसूल मंत्री विखे-पाटील यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

**भटक्या विमुक्त समाजातील नागरिकांना महिना भरात दाखले वाटप करा त्यासाठी विशेष शिबिरांचे सर्व जिल्ह्यात आयोजन करण्याचे आदेश महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. त्याच बरोबर कागदपत्रांची कोणतीही जाचक अट न ठेवता कोणत्याही एका पुराव्यावर त्यांना दाखले देण्यात यावेत असेही त्यांनी बैठकीत सांगितले.**

भटके विमुक्त यांना विविध दाखले मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनातील कार्यालयात विषेश बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीला सदर बैठकीला इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, महाआयटी विभागाच्या मुख्य व्यवस्थापक जयश्री भोज, त्याचबरोबर भटके विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष डॉ. संजय पुरी आणि इतर पदाधिकारी यांच्यासह दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी उपस्थित होते. यावेळी महसूल मंत्री यांनी भटक्या विमुक्त विकास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या विविध मागण्या आणि दाखले मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी समजून घेतल्या. आधार कार्ड, शिधा पत्रिका, आयुष्यमान कार्ड, जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र असे विविध दाखले देण्यासाठी भटक्या विमुक्त विकास परिषदेच्या संयोजकांवरोबर तालुका स्तरावर तहसीलदार, ग्रामसेवक यांनी काम करावे आणि प्राधान्याने



महिनाभरात जास्तीत जास्त शिबिरे राबवून त्यांना दाखल्यांचे वाटप करावे असे मंत्री महोदय म्हणाले. आणि सर्व विभागीय आयुक्तांनी दर आठवड्याला या संदर्भात बैठक घेऊन आढावा घेऊन आलेल्या अडचणी सोडवाव्यात आणि ३० ऑगस्ट पर्यंत ही मोहीम पूर्ण करावी असेही सांगितले. त्यामुळे आता भटके विमुक्त समाजातील नागरिकांना मतदान कार्ड, सामाजिक न्याय विभागाच्या जिल्हा समाज कल्याण अधिकारी किंवा अधिकृत केलेल्या राजपत्रित अधिकाऱ्याचा भटके विमुक्त समाजाचा असल्याचा दाखला, शहरी भागात नगरसेवकांचा व ग्रामीण भागात सरपंच/उपसरपंच यांचा रहिवाशी दाखला यापैकी कोणतेही एक कादगपत्र असल्यास आवश्यक असलेले दाखले मिळणार आहेत.

# नीट पेपरफुटी प्रकरणातील सूत्रधार जेरबंद

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**नीट पेपरफुटी प्रकरणातील कथित सूत्रधार राकेश रंजन उर्फ रॉकी याला केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) गुरूवारी (दि.११) बिहारमधील नालंदा येथे अटक केली. त्याला पाटणा येथील सीबीआय न्यायालयाने १० दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे.**

राकेश रंजन याचा माग काढण्यासाठी पाटणा आणि कोलकाता येथे विविध ठिकाणी सीबीआयने शोध घेतला. राकेशचा आयपी अड्रेस आणि ईमेल अड्रेसद्वारे शोध घेण्यासाठी सीबीआयने प्रगत तंत्रांचा वापर केला. यावेळी रॉकी बाबत माहिती मिळाली. नालंदा येथे त्याला अटक करण्यात आली असून, अनेक कागदपत्रेही जप्त करण्यात आल्याची माहिती सीबीआय अधिकाऱ्यांनी दिली. राकेश रंजन उर्फ रॉकी याच्या मालकीचे झारखंडची राजधानी रांचीमध्ये हॉटेल आहे. रॉकी यानेच नीटची प्रश्नपत्रिका फुटल्यानंतर ती एका उमेदवाराकडे पाठवल्याचा आरोप आहे. या प्रकरणात सीबीआयने एका उमेदवारासह आणखी दोन जणांना पाटणा येथून अटक केल्यानंतर दोन दिवसांनी मुख्य




आरोपीची अटक करण्यात आली आहे.

**आतापर्यंत ११ जणांना अटक**

सीबीआयने अटक केलेला उमेदवार सनी हा मुळचा नालंदा येथील आहे. सीबीआयने आतापर्यंत बिहारमध्ये नीट पेपरफुटी प्रकरणी नऊ जणांना तर लातूर आणि गोध्रा येथे फेरफार प्रकरणी प्रत्येकी एकाला अटक केली आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने आतापर्यंत सहा जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. पेपर लीक प्रकरणी बिहारमधून सीबीआयने अटक केलला रॉकी हा नववा संशयित आरोपी आहे.

**परीक्षेबाबत १८ जुलैला फैसला**

नीट परीक्षा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर गुरूवारी (दि.११) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार होती. मात्र सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील न्यायमूर्ती जेबी परडीवाला, न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने या प्रकरणांची सुनावणी तहकूब केली आहे. आता या प्रकरणी पुढील सुनावणी गुरुवार, दि. १८ जुलै रोजी होणार आहे. दरम्यान, याचिकाकर्त्यांच्या वकील नीतू वर्मा यांनी सीबीआयकडून काही तपास अहवाल मागवला होता; पण सीबीआयने अद्याप कोणताही तपास अहवाल सादर केलेला नाही, असे सांगितले.

# अजित पवारांची राष्ट्रवादी जम्मू-काश्मीरमध्येही लढणार विधानसभा

**श्रीनगर । वृत्तसंस्था**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुक लढवणार असून, राष्ट्रवादी काँग्रेसने जम्मू- काश्मीरमध्ये निवडणूकपूर्व हालचाली सुरू केल्या आहेत. त्याच पार्श्वभूमीवर राज्य समितीने पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते ब्रिजमोहन श्रीवास्तव यांचा दौरा जाहीर केला आहे. राष्ट्रीय सरचिटणीस जम्मू-काश्मीर विभागाच्या ८ दिवसांच्या या दौऱ्यात पक्ष कार्यकर्त्यांना सक्रीय करणार असून पक्षाच्या योजना आणि जम्मू-काश्मीरच्या विकासाबाबत माहिती देणार असल्याची माहिती जम्मू-काश्मीरचे प्रदेशाध्यक्ष डॉ. तारिक रसूल यांनी दिली. यामुळे, अजित पवारांच्या नेतृत्त्वात आता राष्ट्रवादी काश्मीर खोऱ्यातही झेंडा रोवण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येते.**

तळागाळातील कार्यकर्त्यांना सशक्त करणे हा पक्षाचा उद्देश आहे. यावेळी ब्रिजमोहन श्रीवास्तव वैयक्तिकरित्या जिल्हा अधिकारी, कार्यकर्ते आणि विशेषत: बूथ प्रभारी यांच्याशी चर्चा करतील आणि या बैठकींमुळे पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत होईल, ज्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाचे तळागाळातील योद्धे तयार होतील असा विश्वास व्यक्त करतानाच पक्षाच्या कार्यकर्त्यांशी संवाद संघटनेचा पाया मजबूत करतो, ज्यामुळे पक्षाची वाटचाल निवडणुकीत विजयाकडे होते, म्हणूनच पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला सक्षम करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे तारीक रसूल यांनी सांगितले. ब्रिजमोहन श्रीवास्तव हे राष्ट्रीय प्रवक्ता असल्याने त्यांना प्रसारमाध्यमांचे महत्त्व कळते आणि पत्रकारितेचे सामर्थ्य त्यांना कळते, त्यामुळे ते स्थानिक पत्रकार, पत्रकार प्रतिनिधी आणि प्रसारमाध्यमांच्या भेटी घेणार आहेत.

आमचा पक्ष जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि पक्षाचा दृष्टिकोन स्पष्ट करण्याला जास्त महत्त्व देतो असा आत्मविश्वास व्यक्त करतानाच डॉ. तारिक रसूल यांनी श्रीवास्तव यांना जम्मू - काश्मीरमधील लोकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी तिथल्या वास्तविकतेला सामोरे जायचे आहे असे सांगितले. ब्रिजमोहन श्रीवास्तव हे १२ जुलै रोजी श्रीनगरला पोहोचतील आणि १९ जुलै २०२४ रोजी परततील, या दरम्यान ते ८ जिल्हे आणि सुमारे ३७ मतदारसंघामधील कार्यकर्त्यांना भेटणार आहेत. ब्रिजमोहन श्रीवास्तव हे जम्मू-काश्मीरमध्ये पक्षाचे भविष्य मजबूत करतील, असा विश्वासही तारिक रसूल यांनी व्यक्त केला. आमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार आणि कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल पटेल यांची जनतेच्या सेवेसाठी बांधिलकी आहे. आमचा राजकीय प्रवास हा पदांसाठी नसून आम्ही प्रतिनिधित्व करत असलेल्या लोकांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी आहे. आमची कृती ही आमच्या शब्दांपेक्षा कामाकडे जास्त असली पाहिजे आणि आमचे समर्पण हे देशाला पुढे नेणारे दीपस्तंभ असले पाहिजे आणि म्हणूनच आमच्या नेत्यांच्या भावनेनुसार जम्मू-काश्मीरमधील आमच्या पक्ष कार्यकर्त्यांना तयार करण्यासाठी मी प्रयत्न करेन, अशी माहिती ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी दिली.

## पान १वरून...

पान १वरून...

### संपूर्ण कर्जमुक्ती देऊन थकित

सरकारची परिस्थिती आहे. दिरंगाईवीर सरकारने आता प्रचार, निवडणुका, प्रसिद्धी, टेंडर, कंत्राट यातून बाहेर पडून शेतकऱ्यांसाठी झोकून देऊन काम करावे, अशा शब्दात वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली. राज्यात बोगस बियाण्यांची सर्रास विक्री सुरु आहे. मात्र सरकारचे याकडे लक्ष नाही. पीकविमा कंपन्यांची मुजोरी वाढली आहे. त्यांना देखील जरब बसविली पाहिजे. कांदा, कापूस, सोयाबीन, धान उत्पादक शेतकरी संकटात आहे या शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही. मागेल त्याला शेततळे योजनेसाठी अनुदान ही योजना वास्तवात फसवी आहे. मात्र या योजनेमध्ये कागदपत्रांचा बाऊ केला जातो. मागणीच्या प्रमाणात शेतकऱ्यांसाठी शेततळी मंजूर केली जात नाही. असा हल्लाबोल वडेट्टीवार यांनी केला. आस्मानी संकटाबरोबरच सरकारच्या सुलतानी संकटामुळे शेतकरी आत्महत्या करत आहे. त्यामुळे बळीराजा या महापापी सरकारला अगामी विधानसभा निवडणूकीत सत्तेवरुन खाली खेचल्याशिवाय राहाणार नाही. असा इशाराही त्यांनी दिला.

---------

### यांची एकदा जिरवलीय,

मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. गुरुवारी त्यांनी बीडमध्ये शांतता रॅली काढली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करुन रॅलीला सुरुवात करण्यात आली. सुभाष रोड, साठे चौक, जालना रोड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात रॅलीचा समारोप झाला. यावेळी जरांगे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करीत आशिर्वाद घेतले. यावेळी बोलताना जरांगे म्हणाले, बीडमध्ये जर यापुढे कुणी मराठा समाजाला विरोध केलाच तर त्याला त्याची जागा दाखवा, त्याला निवडणुकीत पाडा असे आवाहन त्यांनी मराठा समाजाला यावेळी केले. तसेच सरकारला राज्यात दंगली घडवायच्या आहेत. छगन भुजबळला पुढे करुन या दंगली घडवायच्या असून मराठा समाज हे होऊ देणार नाही, असेही ते म्हणाले. मराठा समाजाला त्रास देणारे हे ओबीसी किंव मराठा समाजातील असले तरी त्यांना निवडणुकीत पाडा, असे सांगून जरांगे म्हणाले, सगेसोयऱ्याची अमलबजावणी झाल्याशिवाय माघार नाही, सरकारला १३ तारखेपर्यंत वेळ दिला आहे. मंत्री शंभुराज देसाई यांच्यावर विश्वास ठेवला असून जर त्यांनी त्यांचा शब्द पाळला नाही, तर आपण आपला निर्णय घेऊ. त्याची मोठी किमत त्यांना मोजावी लागेल असेही जरांगे म्हणाले. यावेळी मनोज जरांगे यांनी मुंडे बहिण-भावावर हल्लाबोल करीत सांगितले, लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाने तुम्हाला मतदान केले तरी तुम्ही समाजाला बदनाम केले. आमच्या पोरांना तुम्ही मारहाण केली. आता हे बंद करा, नाही तर यांची एकदा जिरवली आहे, पुन्हा जिरवणार असल्याचा थेट हल्लाबोल केला. बीड जिल्हयात मराठा समाजाला त्रास देणाऱ्या सगळ्यांना पाडा असे सांगून ते म्हणाले, आपल्याला साथ देणाऱ्या मग ते ओबीसीमधील असले तरी त्यांना निवडूण आणा, श्रीमंत मराठे आता कामाचे नाहीत, गोरगरीब मराठ्यांना आता निवडुण द्या असे आवाहन त्यांनी मराठा समाजाला केले. तसेच सर्वपक्षीय बैठकीला न गेल्याने महाविकास आघाडीच्या नेत्यांवर निशाणा साधला. बीड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने मराठा समाज बांधव शांतता रॅलीमध्ये सहभागी झाले होते. रॅली असल्याने शहरात गर्दी होणार होती, त्यामुळे बीडमधील सर्व शाळांना सुट्टी देण्यात आली होती.

----------

### आता नवा नारा, अबकी

आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राचे चित्र बदलताना दिसत आहे. शेतकरी आणि जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि महाराष्ट्रात एक शक्ती उभी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला असून अनेक लोक पक्षात सहभागी होत आहेत. असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

----------------

### विधान परिषद निवडणुकीत

**चार आमदार फुटणार असल्याचा दावा केला आहे.**

ती तीन ते चार मते वगळून मी जिंकून येणार असल्याचा दावा जयंत पाटील यांनी केला. पाटील म्हणाले की, माझ्या चेहऱ्यावर तुम्हाला कुठे धाकधूक दिसते का? नाही. कारण आमच्या तिन्ही उमेदवारांना पूर्ण निवडून येणार असल्याचा विश्वास आहे. आमच्याकडे क्रॉस होणार नाही. तीन ते चार मते क्रॉस होणार आहेत. ती आम्ही आहेत. ते नावालाच काँग्रेसमध्ये असल्याचे आम्हाला माहिती आहे. त्यामुळे आम्ही त्यांना सोडून दिले आहे. जयंत पाटील यांनी शरद पवार यांचा पूर्ण पाठिंबा असल्याचे सांगितले.

**चार आमदार फुरणार हे माहित-आ. गोरंट्याल**

आमचे चार आमदार फुटणार असल्याची अगोदरच आम्हाला कल्पना आहे. जर ते फुटले तर त्यांचे कान टोचण्याचे काम आम्ही करु, असे काँग्रेसचे आ. कैलाश गोरंट्याल यांनी सांगितले.

**अजित पवार काँग्रेसचे ३ मते फोडणार**

उपमुख्यमंत्री अजित पवार विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचे किमान ३ मतं फोडणार, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. अजित पवारांना दोन्ही उमेदवार निवडून आणण्यासाठी ५ मतांची आवश्यकता आहे. अजित पवार यांच्याकडे सध्या २ अपक्ष आमदारांची मते आहेत. पण तरीही त्यांना आणखी ३ मतांची आवश्यकता असणार आहे. त्यामुळे ते काँग्रेसचे ३ मतं फोडणार, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

------------

### स्मार्ट मीटर

परवानगी नाकारली होती. त्यानंतर गुरूवार दि. ११ जुलै रोजी खासदार वर्षा गायकवाड यांनी मुंबईतील बीकेसी पोलिस स्टेशनवर मोर्चा काढला. काँग्रेसकडून दोन दिवसांपूर्वी या आंदोलनाचे पोलिसांना पत्र देण्यात आले होते. मात्र सुरक्षेचा कारणास्तव पोलिसांनी मोर्चाला परवानगी नाकारली. या मोर्चानंतर पोलिसांनी आंदोलकांच्या गाड्या ताब्यात घेतल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. मुंबईतील स्मार्ट मीटर विरोधात काँग्रेसचे मुंबईत वांद्रे बीकेसी परिसरामध्ये आंदोलन होणार होते. मात्र सुरक्षेच्या कारणास्तव पोलिसांनी या मोर्चाला परवानगी नाकारली. यानंतर काँग्रेस नेते बीकेसी पोलिस ठाण्यात परवानगीसाठी दाखल झाले. तर दुसरीकडे कार्यकर्ते हे पोलिस ठाण्याबाहेर करत घोषणाबाजी करताना पाहायला मिळाले.

--------

cmyk

## संभाजीनगर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

बीड : विश्वकर्मा वंशीय समाज संघटन महाराष्ट्र राज्य व छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र संभाजीनगर येथे विश्वकर्मा समाजातील गुणवंत विद्यार्थी ,कारागीर , उद्योजक,गुणवंत वारकरी संप्रदायीक मंडळी व विविध खेळामध्ये यश प्राप्त केलेल्या मंडळी यांचा कौतुक सोहळा रविवार रोजी पार पडला.

यावेळी समाजातील २०० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री खासदार संदिपान भुमरे व विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नागोराव पांचाळ ,शिंदेसेनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र जंजाळ मनसेचे जिल्हाध्यक्ष सुमित खांबेकर,यांची प्रमुख उपस्थिती होती.समाजातील उद्योजक तानाजी शेटे, उद्योजक रवींद्र पांचाळ, स्वागत अध्यक्ष दादूलाल बोरकर , राज्य उपाध्यक्ष धनंजय वेलनकर, अमरावती विभाग अध्यक्ष गणेश लाटेकर,झडख राजेंद्र बोराडे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हा संघटक वाल्मीक शिरसाट, सोनार समाज चे व संघटनेचे राज्य संघटक शिवानंद थोरकर,भाजपा चे सरचिटणीस संजय बोराडे, जांगीड महासभा चे अध्यक्ष प्रकाश जांगिड,प्रसिद्ध एज्युकेशन ॲडव्हाइझर व मोटिवेटर सदाशिव पांचाळ, संघटनेचे राज्य सचिव भाऊसाहेब राऊत, राज्य प्रवक्ते विलास पवार, कोहलर या कंपनीचे क्वालिटी मॅनेजर ललित अमृतकर,डॉ कल्याणी सपकाळ, राज्य कार्याध्यक्ष शुभदा धामापूरकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.



# ग्रामीण भागातील मातीची घरे कालबाह्य होण्याच्या मार्गावर; सिमेंट काँक्रीट घर बांधकामाचा परिणाम

## जुन्या काळामध्ये मातीची घरे सर्व वातावरणामध्ये पोषक मानली जायची

ज्योतीराम पाढंरपोटे । माजलगाव

गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण भागात असलेली मातीची तसेच कुडांची घरे वाढत्या सिमेंटच्या घरांच्या बांधकामामुळे कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे पर्यावरणावर देखील याचा परिणाम जाणवू लागला आहे.पूर्वी ग्रामीण भागातील एखाद्या गावात गेल्यास त्या ठिकाणी आपल्याला सर्वत्र मातीची तसेच कुडांची घरे दिसत होती.कुठेही सिमेंटचे घरांच्या बांधकामाचं अस्तित्वात नव्हते. घरेदेखील आकर्षक होती.प्रत्येक ऋतूमध्ये ही घरे घराघरातील व्यक्तींसाठी पोषक वातावरणाची निर्मिती करत होते. त्यामुळे ती खूपच सुरेख होती तसेच आरोग्याच्या दृष्टीने चांगलीदेखील होती.परंतु ग्रामीण भागातील लोकांचा वावर कामानिमित्त शहराकडे अधिक होऊ लागल्यामुळे आणि त्या ठिकाणी बांधण्यात आलेली सिमेंटची घरे पाहून त्यांच्या मानसिकतेतही बदल होऊ लागला. हळूहळू गावात असणाऱ्या मातीच्या घरांची जागा सिमेंटच्या घरांनी घ्यायला सुरवात केली.लांबून दिसायला सिमेंटचे घर उत्तम त्याच बरोबर मजबूत वाटत असले तरी या घरात राहताना प्रत्येक ऋतूमध्ये काही ना काही त्रास हा घरातील सदस्यांना होतच असतो.जुन्या काळामध्ये मातीची घरे सर्व वातावरणामध्ये पोषक मानली जायची. उन्हाळ्यामध्ये ही घरे सर्वाधिक थंड असायची.या ठिकाणी कुठल्याही प्रकारचा एसी न लावता या घरात थंड वारा वाहत राहायचा.त्यामुळे भरदुपारी उन्हाळ्यात देखील घरच्या सदस्यांना शांत झोप लागायची. हिवाळ्यात ही घरे उबदार असायची. घरात जास्त थंडी जाणवत नसायची. त्यामुळे उन्हाळ्याबरोबर हिवाळ्यातदेखील या घराचे वातावरण प्रसन्न असायचे. पावसाळ्यात याच घरांना असलेले छत उकरले जायचे. त्याच्यावर उसाचा कोरडा झालेला पाला पाचोळा त्याचबरोबर तुरीच्या काड्या अंथरल्या जायच्या आणि त्यावर चिखल माखला जायचा. त्या चिखलावर नजीक असलेली तुराटी माती वरती टाकली जायची ज्यामुळे किती जरी पाऊस झाला तरी हे छत गळत नव्हते. कारण ती तुराटी माती त्या ठिकाणी घट्ट रुतून बसायची. पाऊस किती जरी झाला तरी भिंती गळून पडत नव्हत्या किंवा घरामध्ये पाणी येत नव्हते.







### मातीच्या घराचे आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर

मातीचे घर किंवा झोपड्या सर्व नैसर्गिक साहित्यापासून बनविल्या जातात आणि त्यामध्ये शून्य कार्बन फूटप्रिंट असते.ही घरे सिमेंट आणि विटांनी बनवलेल्या आधुनिक घरांपेक्षा खूप मजबूत आहेत.मातीच्या घरामध्ये किंवा झोपड्यांमध्ये थर्मो इन्सुलेशन गुणधर्म असतात ज्यामुळे ते हिवाळ्यात उबदार आणि उन्हाळ्यात थंड राहू देते. उन्हाळ्यात, घरातील किंवा झोपडीतील तापमान बाहेरील वातावरणापेक्षा १० अंश थंड असू शकते.शेणाचे प्लास्टर त्यात जलरोधक आणि मच्छर प्रतिबंधक स्वभावाचे गुण धारण करण्यास अनुमती देते.त्याच वेळी ते हवा शुद्ध करते आणि श्वास घेण्यास मदत करते.शेणाच्या सारवणामुळे शरीर आणि पृथ्वी यांच्यामध्ये उर्जेचे सहज संक्रमण होण्यास मदत होते. त्यामुळे निसर्ग आणि शरीर यांच्यातील संतुलन राखण्यास मदत होते.पृथ्वीने माणसाच्या शरीरातील नकारात्मक ऊर्जा स्वीकारणे आणि सकारात्मक ऊर्जा परत आपल्यापर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.मातीच्या घरात शेणांनी सारवलेल्या जमिनीवर झोपणे देखील पाठदुखी उपयुक्त आहे.या मातीच्या घरात किंवा झोपड्यांमध्ये राहणे मजेदार आहे जे आपल्याला खूप सकारात्मक गोष्टी प्रदान करतात.

> “ मातीची घरे फायदेशीर असतात त्याचप्रमाणे त्यांचे काही तोटेदेखील आहेत.अशा घरांना पावसापासून सुरक्षित ठेवावे लागते.त्यासाठी घराचा पाया योग्य उंचीवर बांधणे आवश्यक असते. भिंतीच्या पायामधून पाण्याचा योग्य निचरा होईल,अशी रचना करावी लागते.अन्यथा भिंतीतून ओल आत येते.

> “ घर म्हणजे ऊन,थंडी, वारा,पावसापासून सुरक्षित असलेला आसरा.निसर्गात प्रत्येक प्राणी-पक्षी घरे बनवतात.पण त्यांच्या घरे बांधणीमुळे कधीच निसर्गाला इजा होत नाही.हिरव्यागार झाडीमध्ये पक्षी-प्राणी घरटी करतात.पुढे घरटय़ाचे काम झाले की ते निसर्गातून जसे आले होते तसे निसर्गाकडे परत जातात.अशीच घरे कधीकाळी माणूसही बांधत होता.त्याची बांधलेली चुना, माती,कुडाची घरे निसर्गाच्या मूळ संरचनेवर काहीच विपरीत परिणाम करत नव्हती.आणि घरे बनवण्यासाठी माणसाने वापरलेली पंचमहाभूते वेळ आल्यावर पुन्हा निसर्गात विलीन होत असत.त्या वेळी घरे बांधणीसाठी माणसाने कधी डोंगर-टेकडय़ा फोडल्या नाहीत, नद्या/नाले खरवडले नाहीत.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात करिअर कट्टा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांत महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविल्या जाणाऱ्या करिअर कट्टा योजनेच्या मार्गदर्शन केंद्राचे चालू शैक्षणिक वर्षाकरिताचे उद्घाटन १० जुलै रोजी उत्साहात संपन्न झाले.




कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रोफेसर सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक प्रोफेसर गणेश पाचकोरे, करिअर कट्टाचे समन्वयक डॉ. कुशाबा साळुंके, डॉ. अशोक नागरगोजे, प्रोफेसर महादेव काळे, प्रा. रुपेश कोकाटे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील महाविद्यालयीन युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टाच्या माध्यमातून 'आयएएस आपल्या भेटीला' व 'उद्योजक आपल्या भेटीला' या दोन उपक्रमांच्या अंतर्गत विविध स्पर्धा परीक्षा तसेच उद्योजकता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जाते. करिअर कट्टाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना अनेक कौशल्याभिमुख प्रमाणपत्र अभ्यासक्रम व प्रशिक्षणे उपलब्ध करून दिली जातात.

महाविद्यालयाच्या करिअर कट्टा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. कुशाबा साळुंके हे असून डॉ. कल्याण घोडके, डॉ. पद्माकर ससाणे, डॉ. दिलीप गिऱ्हे, प्रा. गणेश देशमाने हे सदस्य आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी करिअर कट्टामध्ये सहभागी होऊन या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी उदघाटनप्रसंगी केले.

## नव वधूवरांची माऊलींच्या पायी दिंडी सोहळ्यातील सुखद वाटचाल

### आदित्य ताठे आणि सौ.सुवर्णा ताठे यांच्या नवजीवनाचा प्रवास पंढरीच्या वारीतून

आष्टी । प्रतिनिधी

लाडक्या विठुरायाच्या भेटीसाठी आतुरलेल्या मनातून भक्ती,भाव, श्रद्धा,निष्ठा आणि अतिव ओढ असलेल्या हृदयाच्या प्रेम भावनेतून माऊलींच्या पायी दिंडी सोहळ्यात उत्स्फूर्तपणे सहभागी होत एका वधूवर दांपत्याने वारीतून आपल्या जीवनाचा श्री गणेशा केला आहे!

अहमदनगर शहरातील गाडळकर मळ्यातील संत शिरोमणी सावतामाळी मंदिर देवस्थानची आषाढीनिमित्त पायी दिंडी सोहळा दिंडी संस्थापक ह.भ.प. रामदास गाडळकर महाराज असुन संत श्रीपादबाबा चव्हाण (घोटी) यांच्या कृपाशीर्वादाने ह.भ.प. अरुण महाराज धाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि.७ जुलै रोजी दिंडीचे प्रस्थान झाले.दि. १६ जुलै रोजी पंढरीत दिंडी पोहचणार आहे. अहमदनगर (अहिल्यानगर) शहरातील प्रसिध्द कांदा व्यापारी राजेंद्रशेठ ताठे यांचे चिरंजीव आदित्य ताठे आणि सौ.सुवर्णा आदित्य ताठे हे उच्च शिक्षीत नव वधूवर माऊलींच्या पायी पालखी सोहळ्यात सहभागी झाले आहेत. त्यांच्यासमवेत सुवर्णाची नणंद कु.साक्षी राजेंद्रशेठ ताठे,सौ.पुनम ताठे,सौ. स्मिता पडोळे पायी दिंडीत आहेत.विशेष म्हणजे आदित्य व सुवर्णाचे चार महिन्यापूर्वी लग्न झाले आहे. घरची परिस्थिती अत्यंत चांगली असून उच्च शिक्षीत असुनही कुटुंबामध्ये भक्ती,आध्यात्मिक वातावरण तसेच विठ्ठल नामस्मरणाच्या पवित्र वातावरणाची परंपरा आहे आणि म्हणूनच आदित्य यांचा विवाह नुकताच झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या सौभाग्यवतीसह लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी वारीमधून जीवानाचा प्रवास सुरू केला.हा केवळ वारीतला प्रवास नव्हे तर त्यांच्या जीवनाचा प्रवास आहे.हा अत्यंत पवित्र सुखद असा प्रवास ठरतो आहे.

पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनाची ओढ लागली आहे.महाराष्ट्रासह देशभरातील भाविक भक्तांना लागले आहे. यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त द-याखोऱ्यातुन, डोंगरातून मिळेल त्या मार्गाने आणि ऊन वारा पाऊसात पंढरीकडे प्रवास करीत आहेत. देवयानी आषाढी एकादशी पंढरपूर यात्रा १७ जुलै अर्थात बुधवारी आहे. त्या अनुषंगाने ही भावीक मंडळी अत्यंत पवित्र मनाने विठुरायाच्या जयघोषात पंढरीकडे पायी प्रस्थान करीत आहे.याच वारीमध्ये माऊलींच्या पायी दिंडी सोहळ्यात विठुरायाच्या नाम घोषात पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करत डोक्यावर पांढरीशुभ्र टोपी गळ्यात पवित्र तुळशीची माळ आणि हातात टाळ घेऊन हे नवदांपत्य पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनासाठी पायी दिंडी सोहळ्यात मार्गस्थ झाले आहेत.सौ. सुवर्णा ही सुप्रसिद्ध अभियंता पी.बी.बोडखे यांची कन्या आहे तर ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांची पुतणी आहे. एकंदरीत,या नव वधू वर उच्च शिक्षीत जोडीच्या उत्स्फूर्त वारीतील सहभागाची चर्चा मात्र वारीतील भाविक भक्तांमध्ये होत असून सहकारी भाविकांना यातून प्रेरणा आणि तरुणाईचा सहभाग यामुळे वेगळेपण वाटत आहे.

## कर्जत-जामखेड मतदारसंघातील २५ रस्त्यांसाठी ९३ कोटींचा निधी मंजुर

जामखेड । प्रतिनिधी

कर्जत व जामखेड या दोन तालुक्यातील रस्त्यांची कामे मार्गी लागावीत यासाठी आमदार प्रा.राम शिंदे यांचा सातत्याने सरकारकडे पाठपुरावा सुरु असतो. या पाठपुराव्याला आणखीन एक मोठे यश मिळाले आहे. महायुती सरकारने अर्थसंकल्पीय (पावसाळी) अधिवेशनात रस्त्यांच्या कामांसाठी ९३ कोटी ५५ लाख रूपयांच्या भरीव निधीस मंजुरी दिली आहे. आमदार प्रा. राम शिंदे यांनी रस्त्यांच्या कामासाठी भरिव निधी खेचून आणल्यामुळे मतदारसंघातील जनतेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कर्जत जामखेड मतदारसंघात दळणवळणाच्या सुविधा अधिक गतीमान व्हाव्यात यासाठी आमदार प्रा राम शिंदे हे नेहमीच आग्रही राहिले आहेत. 'गाव तिथे रस्ता, वाडी तिथे रस्ता' व्हावा, यासाठी आमदार शिंदे हे सातत्याने सरकारकडे पाठपुरावा करत असतात. आजवर त्यांनी रस्त्यांच्या कामांसाठी करोडो रूपयांचा निधी खेचून आणला आहे. त्यामुळे मतदारसंघात रस्त्यांचे मजबुत जाळे निर्माण झाले आहे. मतदारसंघातील काही भागातील रस्त्यांचे प्रश्न प्रलंबित होते. त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आमदार शिंदे यांचा सरकारकडे पाठपुरावा सुरु होता. अखेर या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. अर्थसंकल्पीय पावसाळी अधिवेशनात सरकारने कर्जत-जामखेड मतदारसंघासाठी तब्बल ९३ कोटी ५५ लाख रूपयांचा भरघोस निधी मंजुर केला आहे



कर्जत-जामखेड मतदारसंघातील २५ रस्त्यांसाठी ९३ कोटी ५५ लाख रूपयांच्या भरीव निधीस महायुती सरकारकडून मंजुरी मिळाली आहे. यामध्ये जामखेड तालुक्यातील ८ रस्त्यांसाठी ०७ कोटी २० लाख तर कर्जत तालुक्यातील १७ रस्त्यांसाठी ८६ कोटी ३५ लाख रूपयांचा निधी मंजुर झाला आहे. अर्थसंकल्पीय पावसाळी अधिवेशनातून आमदार शिंदे यांनी कर्जत-जामखेड मतदारसंघासाठी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला आहे. आमदार शिंदे यांच्या विकासात्मक धोरणामुळे मतदारसंघातील रस्त्यांमध्ये सातत्याने अमूलाग्र बदल झाल्याचे दिसत आहे. रस्त्यांची अनेक कामे झाली असून काही कामे सुरु आहेत. तर काही कामांचा पाठपुरावा सुरु असून लवकरच याही कामांना मंजुरी मिळून रस्त्यांचे प्रश्न मार्गी लागणार आहेत.

अर्थसंकल्पीय पावसाळी अधिवेशनात ज्या रस्त्यांची कामे मंजुर झाली आहेत, त्या कामांना निधी द्यावी अशी मागणी या भागातील जनतेकडून सातत्याने होत होती, या मागणीची दखल घेऊन आमदार प्रा.राम शिंदे यांनी सरकारकडे जोरदार पाठपुरावा करत निधी मंजुर करून आणला आहे. महायुती सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनात रस्त्यांच्या कामांसाठी ९३ कोटींचा निधी मंजुर केला आहे. या निधीतून ग्रामीण भागातील दळणवळणाच्या दर्जेदार सुविधा निर्माण होणार आहेत. मजबुत व पक्क्या रस्त्यांच्या निर्माणामुळे अपघाताच्या घटना रोखल्या जाणार आहेत. यामुळे जनतेकडून आमदार प्रा राम शिंदे व महायुती सरकारचे आभार मानले जात आहे.

पान ६ वरून...

### बंद पडलेली जिल्हा परिषद

शाळा चांगली झाल्यानं ते आपल्या पाल्यांना कारेगव्हाण शाळेत पाठवताय. सर्व ग्रामस्थांनी घेतललेल्या निर्णयामुळं तसंच शिक्षकांच्या सहकार्यानं गावातील शाळेचं पुनरुज्जीवन करण्यात आलं. त्यामुळं पटसंख्येत देखील वाढ झाली आहे, अशी माहिती कारेगव्हाणचे सरपंच सदाशिव खंदारे यांनी दिली आहे.

विद्यार्थी पटसंख्येत वाढ : कारेगव्हाण जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या गतवर्षी ७८ टक्के होती. आम्ही सर्व ग्रामस्थांच्या लोकसहभागातून पाच लाख रुपये जमा केले. सर्व खर्च गावकऱ्यांसमोर मांडल्यानंतर शाळेबाबत निर्णय घेण्यात आला. आम्ही चांगलं काम केलं असून, आज या शाळेत १५० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेनं तालुकास्तरावर माझी शाळा सुंदर शाळा पुरस्कारही पटकावला आहे. तालुक्यातील सर्वात खालच्या स्तरावरील शाळेला प्रथम क्रमांक मिळाला आहे. बाहेरगावच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांनी शाळेत पाठवल्यानं विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढली असून, विद्यार्थी, ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे, असं मुख्यध्यापक विकास परदेशी म्हणाले.

### तीन दशकानंतरही पायाभूत

आली. उद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी ५३ भूखंड उपलब्ध करून देण्यात आले असून लॉटरी पद्धतीने या भूखंडांचे वितरण करण्यात आले आहे.

मात्र, एमआयडीसीच्या स्थापनेनंतर या ठिकाणी भूखंडांचे होऊनही अद्याप कोणत्याही पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. परिसरात रस्त्यांची सुविधा नाही. अस्तित्त्वातील पायवाटाच्या रस्त्यांवरही मोठमोठे खड्डे असल्याने तसेच परिसरातील पाणी रिकाम्या भूखंडांतून परिसरात सोडून दिले असल्याने उद्योजकांना निर्मिती केलेला माल बाहेर पाठविणे अशक्य बनले आहे.

विजेसाठी स्वतंत्र विद्युत जनित्राची आवश्यकता असताना ही सुविधा उपलब्ध नसल्याने थोड्याफार प्रमाणात उद्योग सुरू केलेल्या उद्योजकांनी स्वखर्चाने गावठाण हद्दीतील विद्युत जनित्रावर स्वखर्चाने पोल उभे करून जोडणी घेतली आहे. त्यामुळे अतिशय कमी दाबाने वीजपुरवठा व तोही खंडित स्वरुपात होत असल्याने नुकसानीचा सामना करावा लागतो.

एमआयडीसीतील उद्योगांना पाण्याची कोणतीही सोय उपलब्ध नसून काही वर्षांपूर्वी पाण्यासाठी एक जलकुंभ उभारण्यात आला आहे. मात्र, उभारणीपासून हा जलकुंभ कोरडाच असून त्याचीही दुरवस्था झाल्याने यात पाण्याचा संचय होणे शक्य राहिलेले नाही.

एकंदरीत एमआयडीसीला कोणत्याही सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या नसल्याने उद्योजक उद्योग सुरू करण्यास धजावत नसल्याने तालुक्यातील रोजगारनिर्मिती ठप्प असल्याने युवकांना मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे.

## डॉ. गंगाधर मोरजे यांनी लोकसाहित्याला वैश्विक दृष्टिकोन दिला- डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

दिवंगत डॉ. गंगाधर मोरजे यांनी लोकसाहित्याच्या क्षेत्रामध्ये वैश्विक दृष्टिकोन देण्याचे काम केले. लोकसाहित्याचा अभ्यास हा प्रयोगनिष्ठ वाड:मय कलेचा अभ्यास आहे, असे ते मानत असत. त्याचबरोबर साहित्याच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सोडवले पाहिजेत असा त्यांचा विचार होता असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी केले.

दिवंगत साहित्यिक डॉ. गंगाधर मोरजे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पद्मगंगा फाउंडेशन च्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळयात अध्यक्षपदावरून ते बोलत होते. हमाल पंचायत येथील सभागृहात झालेल्या या पुरस्कार वितरण कार्यक्रमास पद्मगंगा फाउंडेशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर, समिक्षक डॉ. सुधाकर शेलार, डॉ. संदीप सांगळे, डॉ. मुसा बागवान, डॉ. सुनील शिंदे, डॉ. धोंडीराम वाडकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. संजीव कुलकर्णी (कथा संग्रह - शास्त्र काट्याची कसोटी), कवयित्री सरोज अल्हाट (काव्य संग्रह अनन्यता), अंबादास हिंगे (कादंबरी - शिवराम), कृष्णा




**राज्यस्तरीय पद्मगंगा पुरस्कार वितरण समारंभ संपन्न**

जाधव (संत साहित्य - एक तरी ओवी), प्रदिप मेहेंदळे (आत्मकथन), डॉ. हंसराज जाधव (महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या चळवळी आणि मराठी साहित्य), डॉ. भारत हंडीबाग (गौरव ग्रंथ) यांना साहित्य क्षेत्रातील पुरस्कार तर ड. विश्वनाथ गोलावर (समाजभूषण), प्रा. डॉ. दत्तात्रय वाघ यांना (आदर्श प्राचार्य), रवींद्र काळे (शैक्षणिक), अविनाश कदम (दर्पण पत्रकारिता), डॉ. सुभाष नागरगोजे (क्रीडारत्न) पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे पुढे म्हणाले की, डॉ. धोंडीराम वाडकर यांनी आपले गुरुवर्य दिवंगत प्रा. डॉ. गंगाधर मोरजे यांच्या स्मृती प्रित्यर्थ पद्मगंगा फाउंडेशन ची स्थापना केली. गेल्या १७ वर्षापासून ते साहित्य, कला, क्रीडा, पत्रकारिता, समाजकार्य व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करतात. या माध्यमातून सबंध समाजाला प्रोत्साहित करण्याचे काम डॉ. धोंडीराम वाडकर करतात.यावेळी डॉ. सुधाकर शेलार, डॉ. संदीप सांगळे, डॉ. मुसा बागवान डॉ. सुनील शिंदे, कवयित्री सरोज आल्हाट, प्राचार्य दत्तात्रय वाघ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर यांनी प्रास्ताविक केले. विठ्ठल बरसमवाड यांनी सूत्रसंचालन केले. तर कल्याणी बरसमवाड यांनी आभार मानले. प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके,प्रा रमेश खिळदकर, पत्रकार भगवान राऊत, पत्रकार जावेद पठाण, डॉ सुनिल गदादे, डॉ विष्णू साबळे, उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य, प्रोफेसर बाबासाहेब झिने, डॉ. शत्रुघ्न करडुळे डॉ. अनिल हजारे, दत्तात्रय गिलचे, विठ्ठल गोरे व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

cmyk




# तीन लाखापेक्षा अधिक शेतकरी अजूनही पीक विमा भरपाई पासून वंचित!

संभाजीनगर : पीक विमा घेतलेल्या शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटामुळे झालेल्या पीक नुकसानीची माहिती विमा कंपनीला ७२ तासांत कळवल्यानंतर ३० दिवसात भरपाई देणे कंपनीला बंधनकारक आहे. मात्र, पीक विमा कंपनीने विविध कारणे देत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सुमारे ५० टक्के शेतकऱ्यांना भरपाई नाकारल्याची माहिती वरिष्ठ सूत्रांकडून मिळाली आहे.

गतवर्षीपासून राज्यातील शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा देण्याची योजना राज्य सरकारने सुरू केली. यामुळे गतवर्षी खरीप हंगामात जिल्ह्यातील ११ लाख ५० हजार ६४४ शेतकऱ्यांनी ५ लाख ५४ हजार ६७५ हेक्टर वरील विविध पिकांचा विमा चोलामंडलम एमएस जनरल विमा या कंपनीकडून उतरविला होता. गतवर्षी जिल्ह्यातील २० कृषी मंडळांतील सुमारे ३०० गावांमध्ये २० दिवसांपेक्षा अधिक काळ पावसाने खंड दिला होता. या गावांतील शेतकऱ्यांना विमा कंपनीने एकूण विम्याच्या २५ टक्के अर्थात ९२ कोटी रुपये वाटप केले होते. सप्टेंबर आणि नोव्हेंबर महिन्यात जिल्ह्यातील विविध मंडळांत अतिवृष्टी झाली. शेतकऱ्यांनी नुकसानाबाबत कंपनीला ऑनलाइन सूचना दिली. डिसेंबर मधील अंतिम पीक कापणी अहवालानंतर जिल्ह्यातील सर्वच पिकांचे उत्पादन ५० टक्क्यांपेक्षा कमी झाले. याविषयीचा अहवाल कृषी विभागाने विमा कंपनीला कळवून शेतकर्यांना नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले. कंपनीने नुकसानाची माहिती कळविणाऱ्या ६ लाख ६३ हजार शेतकऱ्यांपैकी केवळ २ लाख २९ हजार शेतकर्यांचा विमा मंजूर केला. उर्वरित शेतकर्यांचे दावे फेटाळले.




यात नुकसानीची सूचना ७२ तासांत कळवली नाही, बिगर मोसमी पावसात नुकसान झाल्याचे कारण दिले. काही कारणे चुकीची असल्याने दाखवून दावे फेटाळले. दावे फेटाळल्याने शेतकर्यांची विमा कंपनी विरोधात ओरड सुरू झाली. जिल्हा कृषी अधीक्षक प्रकाश देशमुख यांनी कंपनीला पत्र पाठवून दावे नाकारण्याची कारणे देण्याचे निर्देश दिले. यानंतर विमा कंपनीने सारवासारव करीत आणखी १ लाख १४ हजार ६४३ शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर केला. आतापर्यंत विमा कंपनीने ३ लाख ४३ हजार शेतकर्यांना नुकसान भरपाई मंजूर केली. मात्र, अद्यापही ३ लाखांवर शेतकरी वंचित आहेत.

## जमिनीनुसार करा खतांची निवड

पिकांना खते ही लागवडीपासून ते वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेत द्यावी लागतात. पिकांच्या विविध अवस्थेमध्ये वेगवेगळ्या अन्नद्रव्याची आवश्यकता असते. त्यानुसार खताचे व्यवस्थापन करणे फायदेशीर ठरते.

मृदा परीक्षणानुसार पिकांना खते देण्याची शिफारस करण्यात येते. यामध्ये स्फुरद पालाशयुक्त खते पिकास उपलब्ध होण्यास वेळ लागतो, त्यामुळे संपूर्ण मात्रा पिक पेरणीच्या वेळेस द्यावी, तसेच आवश्यकता असल्यास त्यांच्या विद्राव्य स्वरुपातील खतांची वेळ फुलोऱ्याची वेळ, दाणे भरणे वेळेस विद्राव्य खताच्या फवारणीचे अधिक फायदे होतात. नत्रयुक्त खताचा ऱ्हास लवकर होत असल्यामुळे त्यांची आवश्यकतेनुसार दोन ते तीन भागात विभागणी करून त्याची मात्रा पिकात द्यावी.

खतांची निवड : खरीप पिकांसाठी मातीचा प्रकार व पीक यानुसार खताची निवड करावी. माती तपासणीमुळे जमिनीची सुपीकता व गुणदोष याबाबतची माहिती मिळते. जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्याचे प्रमाण, जमिनीचा सामू, सेंद्रिय कर्ब, विद्राव्य क्षारांचे प्रमाण इ. नुसार कोणत्या अन्नद्रव्यांची किती गरज आहे. यांचे प्रमाण ठरवता येते म्हणजेच जमिनीचे आरोग्य समजते. बाजारामध्ये अनेक प्रकारची खते उपलब्ध आहेत. परंतु कोणत्या खतांमध्ये कोणत्या अन्नद्रव्याचे किती प्रमाण व ते कोणत्या स्वरुपात आहे हे पाहून आपल्या पिकासाठी व जमिनीसाठी योग्य आहे का हे पडताळून पाहणे आवश्यक आहे. अशा प्रकारे केलेला खतांचा वापर मूलभूत शिफारशीपेक्षा जास्त परिणामकारक ठरतो व अनावश्यक खतांचा वापर टाळता येऊ शकतो.

जमीन आणि पिकांनुसार खालील प्रमाणे करा खतांचा वापर : पाणी साचलेल्या जमिनीत नायट्रेटयुक्त खते होत नाही. ज्या जमिनीत गंधकाचे प्रमाण कमी आहे अशा जमिनीत अमोनियम सल्फेट किंवा सिंगल सुपर फॉस्फेट या सारख्या गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर करावा. डाळवर्गीय व गळीत पिकांमध्ये गंधकाची आवश्यकता जास्त असते अशा पिकास गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर जास्त करावा. क्षारयुक्त जमिनीत युरीया वापरल्यास त्याचे नायट्रेटमध्ये रुपांतर होण्यास विलंब लागतो, परंतु नायट्रेट जमिनीत राहिल्यास पिकास अपायकारक ठरतो.

म्हणून अशा जमिनीत युरिया ऐवजी अमोनियम नायट्रेट वापरावे. आम्लयुक्त जमिनी सोडून इतर जमिनीत पाण्यात विद्राव्य असलेल्या स्फुरदयुक्त खते वापरावीत. उदा. सिंगल सुपर फॉस्फेट. माती तपासणी अहवालात सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आल्यास शिफारसीनुसार सूक्ष्म अन्नद्रव्याची मात्रा सुध्दा द्यावी कारण ही अन्नद्रव्ये सुध्दा मुख्य व दुय्यम अन्नद्रव्याइतकीच महत्त्वाची असतात.



## लक्षपुर्वक जपा शेळ्यांचे आरोग्य



शेळीपालन व्यवस्थापनात सर्वांत जास्त काळजी ही गोठ्यात असणारी आर्द्रता कमी करण्यासाठी घ्यावी लागते, कारण शेळ्यांना आर्द्रता सहन होत नाही. त्यामुळे त्यांना श्वसनसंस्थेचे आजार होण्याची दाट शक्यता असते. जंताचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी कळपातील सर्व शेळ्यांना जंतुनाशकाची मात्रा द्यावी. गोचीड शरीरातील रक्त शोषतात. त्यामुळे शेळ्या अशक्त होतात. अंगावर खाज सुटते. शेळ्या बैचेन होतात, खाणे बंद करतात, हालचाल मंदावते. हे लक्षात घेऊन गोचीड नियंत्रणावर लक्ष द्यावे. खास तयार केलेल्या खाड्यामधून शेळ्यांना गोचीडनाशक पाण्याने धुऊन घ्यावे.

शेळ्यांना आर्द्रता अजिबात सहन होत नाही म्हणूनच गोठ्यातील आर्द्रता कमी ठेवण्यासाठी गोठ्यात रात्रीच्या वेळी शेगडी लावावी किंवा ६० वॉट क्षमतेचा बल्ब रात्रभर लावून ठेवावा. गोठा कोरडा ठेवावा. गोठ्यातील जमीन जर ओली असेल तर शेळ्यांच्या पायाच्या खुरामध्ये ओलसरपणा राहून फोड येतात. यामुळे शेळ्या लंगडतात, ताप येतो, चारा कमी खाते, अशक्त होतात, दुर्लक्षित राहिल्यास मृत्यू पावतात. पावसात शेळी भिजली की न्यूमोनिया होतो. यामुळे शेळी शिंकते, नाकातून चिकट पांढरा पिवळसर द्रव वाहतो, ताप येतो, धाप लागते इत्यादी लक्षणे दाखविते. या आजारावर उपचार महाग असल्याने आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. म्हणून आजार होणार नाही याची काळजी घ्यावी. उन्हाळ्यात हिरव्या चाऱ्याच्या अभावी झालेली उपासमार आणि पावसानंतर उगवलेला हिरवा चारा शेळ्या जास्त प्रमाणात खातात. या कोवळ्या चाऱ्यामध्ये तंतुमय पदार्थ कमी असतात, त्यामुळे अपचन होते. पोटफुगी, हगवण यांसारखे आजार होतात. पोटफुगीच्या नियंत्रणासाठी गोडे तेल आणि खाण्याचा सोडा पाजला तर पोटफुगी कमी होते. पशुतज्ज्ञाच्या सल्ल्याने हगवणीवर उपचार करावेत. पावसाळ्यात शेळ्यांची खरेदी करू नये, कारण पावसाळ्यात आजाराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. जर गरज भासली तर ज्या भागातून शेळ्या खरेदी करावयाच्या आहेत तेथे आजाराचा प्रादुर्भाव झालेला नसावा. पावसाळ्यात शेळीपालकांनी चारा उपलब्ध होण्यासाठी झाडे, झुडपे आणि गवताची लागवड करावी. सर्वसाधारणपणे दोन शेळ्यांसाठी एक झाड पुरेसे होते.


लाळ्या खुरकूत – हा आजार विषाणूमुळे होतो. याचा प्रादुर्भाव कळपात लवकर होतो. या आजारावर प्रतिबंधक उपायाशिवाय उपचार नाही हे लक्षात घेऊन लसीकरण महत्त्वाचे आहे.

घटसर्प, फऱ्या – पावसाळ्यात या आजारांचा प्रादुर्भाव दिसतो. या आजारांच्या नियंत्रणासाठी लसीकरण महत्त्वाचे आहे. यामुळे उपचारांवर होणारा खर्च टाळता येते.

धनुर्वात – पावसाळ्यात धनुर्वाताचा प्रादुर्भाव होतो, यासाठी वेळेवर लसीकरण आवश्यक आहे.

## व्हाईट बटन मशरूमच्या लागवडीतून मिळतो मोठा नफा

जर तुम्हाला व्हाईट बटन मशरूमची लागवड करायची असेल तर तुम्हाला फक्त १ एसी किंवा हवेशीर खोली किंवा झोपडी लागेल कारण १८-२५ डिग्री सेल्सिअस तापमानात त्याचे उत्पादन चांगले मिळते. त्यानंतर गहू किंवा तांदळाचा पेंढा आणि काही रसायने मिसळून शेतीसाठी खत तयार करा. देशात मशरूमला खूप मागणी आहे. मशरूम वेगवेगळ्या पदार्थांमध्ये वापरतात. विशेषतः शाकाहारी लोकांना ते अधिक आवडू लागले आहे. अशा परिस्थितीत ज्यांना पारंपरिक पिकांची लागवड सोडून शेतीत नवीन काहीतरी करायचे आहे ते मशरूमची शेती करू शकतात. शेतात तसेच घरामध्येही याचे उत्पादन सहज करता येते. त्याच बरोबर सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे त्याची लागवड करणारे शेतकरी कमी कालावधीत चांगले उत्पन्न मिळवू शकतात. तज्ज्ञांच्या मते, व्हाईट बटन मशरूम ही औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेली बुरशी आहे, ती भाजी म्हणून वापरली जाते.



अशा प्रकारे करा मशरूमची लागवड : व्हाईट बटन मशरूमची लागवड करायची असेल तर तुम्हाला फक्त १ एसी किंवा हवेशीर खोली किंवा झोपडी लागेल कारण १८-२५ डिग्री सेल्सिअस तापमानात त्याचे उत्पादन चांगले मिळते. त्यानंतर गहू किंवा तांदळाचा पेंढा आणि काही रसायने मिसळून शेतीसाठी खत तयार करा. हे खत तयार होण्यासाठी एक आठवडा लागतो. कंपोस्ट तयार झाल्यानंतर, खोलीतील कठीण जागेवर ६-८ इंच जाडीचा थर पसरवा, मशरूमच्या बिया लावा आणि तयार कंपोस्टने झाकून टाका.

असे कंपोस्ट तयार करा : मशरूम लागवडीसाठी कंपोस्ट तयार करायचे असेल, तर गव्हाचा किंवा भाताचा पेंढा आणि कोंबडीची विष्ठा किमान ७ थरांमध्ये पसरवा आणि पाण्याने पूर्णपणे शिंपडा. सुमारे १८ तासांनंतर, जिप्सम किंवा कोणतेही कीटकनाशक घाला आणि सर्वकाही चांगले मिसळा. हे मिश्रण ४-५ दिवस हवेत सोडा. ओलावा कमी होताच पाणी फवारावे. यामध्ये जिप्समचा अधिक वापर करा. शेवटी १० मिली मॅलेथिऑन ५ लिटर पाण्यात मिसळून फवारावे. तुम्हाला दिसेल की ५ दिवसात तुमचे कंपोस्ट खत म्हणून पूर्णपणे तयार होईल. कंपोस्ट तयार झाल्यानंतर त्यातून गोड फळांचा वास येऊ लागतो. आता मशरूम कुंडीत भरून वाढवता येतात.

मशरूम लागवडीचे फायदे : पांढऱ्या बटन मशरूमची लागवड करण्यासाठी सुरुवातीचा खर्च ५० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत असू शकतो. वास्तविक, १ किलो मशरूम पिकवण्यासाठी २५ ते ३० रुपये खर्च येतो. त्याचबरोबर बाजारात चांगल्या दर्जाच्या पांढऱ्या बटन मशरूमची किंमत २५० ते ३०० रुपये प्रतिकिलो आहे. अशा प्रकारे तुम्ही १० पट नफा मिळवू शकता. मशरूम बियाणे पेरल्यानंतर, ते सुमारे ४५ दिवसात काढणीसाठी तयार होतात. मशरूम खाण्यास स्वादिष्ट असण्यासोबतच शरीरासाठी देखील खूप फायदेशीर आहे.




### महत्वाच्या घटना

१६७४ : शिवाजी महाराजांनी इंग्रजांशी मित्रत्त्वाचा तह केला.
१७९९ : रणजितसिंग यांनी लाहोर ताब्यात घेतले व ते पंजाबचे सम्राट झाले.
१९२० : पनामा कालव्याचे औपचारिक उद्घाटन झाले. पण याआधीच ६ वर्षे तो वाहतुकीस खुला झाला होता.
१९३५ : आषाढ शुद्ध एकादशी आषाढी एकादशी 'प्रभात'चा 'चन्द्रसेना' हा मराठी चित्रपट मुंबईच्या 'मिनर्व्हा' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. अनेक ट्रिकसीन्स असलेला हा चित्रपट याच नावाच्या मूकपटावर बेतलेला होता.
१९६० : राज्यातील भागलपूर आणि रांची विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.
१९६१ : मुठा नदीच्या आंबी या उपनदीवरील पानशेत व खडकवासला ही धरणे फुटल्यामुळे पुण्यात आलेल्या पुरात सुमारे २,००० लोक मृत्यूमुखी पडले तर १,००,००० लोक विस्थापित झाले.
१९६२ : लंडनमधील मार्की क्लबमधे 'द रोलिंग स्टोन्स' चा पहिला कार्यक्रम झाला.
१९७९ : किरिबातीला (इंग्लंडपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८२ : राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची स्थापना
१९८५ : पी. एन. भगवती यांनी भारताचे १७ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९५ : अभिनेते दिलीपकुमार यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर
१९९८ : १६ व्या विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत यजमान फ्रान्सने गतविजेत्या ब्राझिलचा ३-० असा पराभव करुन विश्वकरंडक जिंकला.
१९९९ : 'महाराष्ट्र भूषण' हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार सुनील गावसकर यांना प्रदान करण्यात आला.
२००१ : कृषीशास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना 'टिळक पुरस्कार' जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०० : १०० ई .पूर्व : रोमन सम्राट ज्यूलियस सीझर यांचा जन्म.
१८१७ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (मृत्यू: ६ मे १८६२)
१८५२ : अर्जेन्टीनाचे राष्ट्राध्यक्ष हिपोलितो य्रिगोयेन यांचा जन्म.
१८५४ : जॉर्ज इस्टमन अमेरिकन संशोधक व इस्टमन कोडॅक कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १४ मार्च १९३२)
१८६३ : वि. का. राजवाडे इतिहासाचार्य (मृत्यू: ३१ डिसेंबर १९२६)
१८६४ : जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर अमेरिकन वनस्पतीतज्ञ, शिक्षणतज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (मृत्यू: ५ जानेवारी १९४३)
१९०९ : बिमल रॉय प्रथितयश दिग्दर्शक (मृत्यू: ८ जानेवारी १९६६)
१९१३ : इंग्रजी लेखक मनोहर माळगावकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ जून २०१०)
१९२० : यशवंत विष्णू चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयाचे १६ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १४ जुलै २००८)
१९४७ : भारतीय क्रिकेट खेळाडू पूचिया कृष्णमूर्ती यांचा जन्म.
१९६१ : भारतीय अभिनेते, गायक आणि निर्माते शिव राजकुमार यांचा जन्म.
१९६५ : संजय मांजरेकर भारतीय क्रिकेट भाष्यकार आणि माजी यष्टिरक्षक क्रिकेटपटू
१९८२ : अर्जुन पुरस्कार विजेता महिला टेबल टेनिसपटू अचंत शरत कमल यांचा जन्मदिन.
१९९७ : युवा नोबल पारितोषिक विजेता पाकिस्तानी स्त्रीवादी शैक्षणिक कार्यकर्त्या महिला मलाला यूसुफजई यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४८९ : दिल्ली येथील लोदी वंशाचे संस्थापक व शासक बहलूल खान लोदी यांचे निधन.
१६६० : बाजी प्रभू देशपांडे (जन्म: ? ? १६१५)
१८९२ : अलेक्झांडर कार्टराईट बेसबॉलचे जनक (जन्म: १७ एप्रिल १८२०)
१९१० : रॉल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक चार्ल्स रोलस्? यांचे निधन. (जन्म: २७ ऑगस्ट १८७७)
१९४९ : आयर्लंड चे पहिले राष्ट्राध्यक्ष डग्लस हाइड यांचे निधन.
१९९४ : हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीचा चालताबोलता इतिहास मानले जाणारे पटकथाकार व 'बॉम्बे पब्लिसिटी सर्व्हिस'चे वसंत साठे (आवारा, श्री ४२०, मेरा नाम जोकर, डॉ. कोटणीसकी अमर कहानी, राम तेरी गंगा मैली) (जन्म:)
१९९९ : राजेंद्रकुमार हिन्दी चित्रपट अभिनेता (जन्म: २० जुलै १९२९)
२००० : मराठी कवयित्री इंदिरा संत यांचे निधन.
२००१ : देवांग मेहता तंत्रज्ञान अग्रणी (जन्म: १० ऑगस्ट १९६०)
२०१२ : दारा सिंग मुष्टीयोद्धा आणि अभिनेता (जन्म: १९ नोव्हेंबर १९२८)
२०१३ : प्राण कृष्ण सिकंद ऊर्फ 'प्राण' चित्रपट अभिनेता (जन्म: १२ फेब्रुवारी १९२०)
२०१३ : बोस कॉर्पोरेशन चे स्थापक अमर बोस यांचे निधन. (जन्म: २ नोव्हेंबर १९२९)

# डॉ. गंगाधर मोरजे यांनी लोकसाहित्याला वैश्विक दृष्टिकोन दिला -डॉ.सहस्रबुद्धे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

दिवंगत डॉ. गंगाधर मोरजे यांनी लोकसाहित्याच्या क्षेत्रामध्ये वैश्विक दृष्टिकोन देण्याचे काम केले. लोकसाहित्याचा अभ्यास हा प्रयोगनिष्ठ वाड:मय कलेचा अभ्यास आहे, असे ते मानत असत. त्याचबरोबर साहित्याच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सोडवले पाहिजेत असा त्यांचा विचार होता असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी केले. दिवंगत साहित्यिक डॉ. गंगाधर मोरजे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पद्मगंगा फाउंडेशन च्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळयात अध्यक्षपदावरून ते बोलत होते. हमाल पंचायत येथील सभागृहात झालेल्या या पुरस्कार वितरण कार्यक्रमास पद्मगंगा



फाउंडेशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर, समिक्षक डॉ. सुधाकर शेलार, डॉ. संदीप सांगळे, डॉ. मुसा बागवान, डॉ. सुनील शिंदे, डॉ. धोंडीराम वाडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ. संजीव कुलकर्णी (कथा संग्रह - शास्त्र काट्याची कसोटी), कवयित्री सरोज अल्हाट (काव्य संग्रह अनन्यता), अंबादास हिंगे (कादंबरी - शिवराम), कृष्णा जाधव (संत साहित्य - एक तरी ओवी), प्रदिप मेहेंदळे (आत्मकथन), डॉ. हंसराज जाधव (महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या चळवळी आणि मराठी साहित्य), डॉ. भारत हंडीबाग (गौरव ग्रंथ) यांना साहित्य क्षेत्रातील पुरस्कार तर ॲड. विश्वनाथ गोलावर (समाजभूषण), प्रा. डॉ. दत्तात्रय वाघ यांना (आदर्श प्राचार्य), रवींद्र काळे (शैक्षणिक), अविनाश कदम (दर्पण पत्रकारिता), डॉ. सुभाष नागरगोजे (क्रीडारत्न) पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. अनिल सहस्रबुद्धे पुढे म्हणाले की, डॉ. धोंडीराम वाडकर यांनी आपले गुरुवर्य दिवंगत प्रा. डॉ. गंगाधर मोरजे यांच्या स्मृती प्रित्यर्थ पद्मगंगा फाउंडेशन ची स्थापना केली. गेल्या १७ वर्षापासून ते साहित्य, कला, क्रीडा, पत्रकारिता, समाजकार्य व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करतात. या माध्यमातून सबंध समाजाला प्रोत्साहित करण्याचे काम डॉ. धोंडीराम वाडकर करतात.यावेळी डॉ. सुधाकर शेलार, डॉ. संदीप सांगळे, डॉ. मुसा बागवान डॉ. सुनील शिंदे, कवयित्री सरोज आल्हाट, प्राचार्य दत्तात्रय वाघ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर यांनी प्रास्ताविक केले. विठ्ठल बरसमवाड यांनी सूत्रसंचालन केले. तर कल्याणी बरसमवाड यांनी आभार मानले. प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके,प्रा रमेश खिळदकर, पत्रकार भगवान राऊत, पत्रकार जावेद पठाण, डॉ सुनिल गदादे, डॉ विष्णू साबळे, उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य, प्रोफेसर बाबासाहेब झिने, डॉ. शत्रुघ्न करडुळे डॉ. अनिल हजारे, दत्तात्रय गिलचे, विठ्ठल गोरे व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# माधवराव निर्मळांची माजलगाव विधानसभा मतदारसंघात क्रेझ



दिंद्रुड । प्रतिनिधी

आगामी काळात येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने माजलगाव मतदार संघातील गावभेटी करत राजकीय,सामाजिक विकासाच्या विविध विषयांवर चर्चा, समस्या व अडीअडचणी जाणून घेण्यासाठी माजलगाव विधानसभा मतदार संघाचे नेते माधव निर्मळ गावभेटी घेत आहेत.मतदार संघास नवीन विश्वासू चेहरा मिळाल्याने मतदार संघात माधवराव निर्मळांची विशेष क्रेझ असल्याचे पहायला मिळत आहे.

पंकजा मुंडे यांच्यासाठी लोकसभा निवडणुकीत घोंगडी बैठकीचे आयोजन गावखेड्यांत करत माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदांरांत विशेष ओळख प्रस्थापित करण्यात माधवराव निर्मळ यशस्वी झाले होते.माजलगांव विधानसभा मतदारसंघात यशस्वी लिड घेण्यात निर्मळ यांचा खारीचा वाटा आहे.लोकसभेनंतर आता येणाऱ्या विधानसभा निवडणुकी साठी माधवराव निर्मळ गावागावात फिरून कार्यकर्ते जमा करण्यात यशस्वी ठरतांना दिसत आहेत.प्रत्येकाच्या सुख दुःखात शामील होत असल्याने मतदारांत विशेष लोकप्रिय होत असल्याने माजलगाव विधानसभा मतदारसंघात नवा व विश्वासू चेहरा पंकजा मुंडे यांना मिळाला असल्याचे बोलले जात आहे.

# आदित्य शिक्षण संस्थेच्या कृषी महाविद्यालयात प्रवेश प्रक्रीया सुरु

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी, बी.एस्सी. अॅग्री, बी. टेक. कृषी अभियांत्रिकी व जैवतंत्रज्ञान अभ्यासक्रमाचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास आदित्य महाविद्य ४ जुलै पासून सुरूवात झालेली आहे. १५ जुलै २०२४ ही अंतिम तारीख असून १२ वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कृषी व संलग्न महाविद्यालयाच्या प्रवेशासाठी आदित्य शिक्षण संस्थेमध्ये मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आलेले आहे. महाविद्यालयात ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध विद्यार्थी, पालकांसाठी केलेली आहे.

सदरील केंद्रामध्ये कृषी विषयक विविध अभ्यासक्रमाचे प्रवेश बाबत व त्याच्या भविष्याच्या संधीबाबत तज्ज्ञ प्राध्यापकाकडून नियमित मार्गदर्शन केलं जातं तसेच कृषि शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया ४ जुलै २०२४ पासून सुरू असून अंतिम १५ जुलै २०२४ आहे. सर्व बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी अन्नतंत्र (बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी) आणि कृषि (बी.एस्सी. ऑनर्स.अग्री), (बी.टेक. जैवतंत्रज्ञान) आणी पदवी शिक्षणासाठी प्रवेश (बी.टेक कृषी अभियांत्रिकी) घेण्यास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी संलग्न असलेल्या ''अ'' दर्जा प्राप्त आदित्य कृषि संलग्न महाविद्यालय बीड येथे ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरुन प्रवेशासाठीचा कोड नंबर फूड टेक १६१७६ आणि बी एस्सी.कृषि

## महाविद्यालयात ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध

१११५२, जैवतंत्रज्ञान महाविद्यालय १९११० कृषी अभियांत्रिकी १५१९५ महाविद्यालय आहे. तरी विद्यार्थ्यांनी फॉर्म भरताना एक नंबरला या महाविद्यालयाचा कोड नंबर द्यावा सदरील सर्व कोर्सेस बाबत मार्गदर्शन आदित्य शिक्षण संस्थेमध्ये सुरू आहे. या संधीचा फायदा सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी परिक्षा तसेच अभ्यासक्रमाशी संबंधित राष्ट्रीय प्रवेश परिक्षा जे.ई.ई. आणि एन.ई.ई.टी. दिलेल्या आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांनी आदित्य कृषि व संलग्न महाविद्यालय नाळवंडी नाका बीड , येथे त्वरित संपर्क करून आपला प्रवेश निश्चित करावा. या महाविद्यालयाचे प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी आणि पालकांनी आदित्य कॅम्पस बीड येथे यावे. याठिकाणी ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याच्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. तसेच सदरील सर्व अभ्यासक्रमासाठी पूर्ण माहिती देण्यात येत आहे.तरी विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेवून नोकरीच्या १०० टक्के संधी असलेल्या या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तत्काळ ९३२६७०७००५/९४०३६०७०७३ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# जिजाऊच्या ठेवीदारांनी दाखल केलेल्या याचिकेत जिल्हाधिकारी यांचे शपथ पत्र दाखल

पाटोदा । प्रतिनिधी

जिजाऊ माँसाहेब मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. ठेवीदारांच्या ठेवी परत कराव्यात, सदरील बँकाचे सहकार खात्यामार्फत तपास करावा याबाबत ठेवीदारांच्या वतीने संतोष अप्पासाहेब जगताप व इतर ४५ ठेवीदारांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्यामार्फत याचीका दाखल केलेली असुन सदरील याचीकेमध्ये यापुर्वी १. सचिव सहकार मंत्रालय भारत सरकार. २. अतिरिक्त सचिव केंद्रीय सहकार सोसायटी नोंदणी कार्यालय. ३. सचिव सहकार मंत्री केंद्रसरकार. ४. केंद्रीय निबंधक मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटी नवी दिल्ली. ५. गर्वनर भारतीय रिर्जव बँक. ६. जिल्हाधिकारी बीड यांना मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने नोटीसा काढल्या होत्या. त्यानंतर सदरील प्रकरणात सहाय्यक आयुक्त सहकार भारत सरकार, केंद्रीय सहकार सोसायटी नोंदणी कार्यालय नवी दिल्ली. यांनी शपथपत्र दाखल करून सदरील शपथपत्रात लेखापरीक्षण २०२०-२१ मध्ये मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटी कायद्याच्या विविध कलमांचे उलंघन झाल्याचे आढळून आल्याचे नमूद केलेले आहे व त्या अनुषंघाने सहाय्यक आयुक्त सहकार भारत सरकार यांनी आयुक्त सहकार व सहकारी सोसायटी नोंदणी महाराष्ट शासन पुणे. यांना वरील जिजाऊ मल्टिस्टेट बँकेची कलम १०८ प्रमणे तपासणि करुन १५ दिवसाच्या आत अहवाल सादर करावा असे आदेश दिल्याचे नमूद केले आहे.

तसेच जिल्हाधिकारी बीड यांनी ठेवीदांराच्या ठेवी परत मिळण्यासाठी व सदरी ल बँकेच्या मालमत्ता तातडिने जप्त करण्यासाठी प्रथमता बँकेने गोळा केलेल्या ठेवीमधून बँकेच्या नावे किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीच्या नावाने संपादन केला असल्याचा मानण्यात येणारा पैसा, किंवा अन्य मालमत्ता जप्त करण्यासाठी असणारी तरतूदीच्या अधिन राहून तथापी मालमत्ता किंवा पैसा जप्तीसाठी उपलब्ध नाही किंवा ठेवी परतफेड करण्यासाठी पुरेशी नाही असे दिसून आल्यास सदरील संस्थेचे प्रर्वतक, संचालक, भागीदार,व्यवस्थापक किंवा सदस्य यांच्या मालमत्ता (जंगम व स्थावर) जप्त करण्याच्या तरतुदीच्या अधिन राहून सदरील प्रकरणात मालमत्ता जप्त करणे, तसेच विक्री केलेल्या मालमत्ता अधिग्रहण करणे, शासन राजपत्र प्रसिद्ध होण्यासाठी प्रधान सचिव विषेश गृहविभाग महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव पाठवण्याचे नमुद केलेले आहे. सदरील याचिकेची सुनावणी दि.१६.०७.२०२४ ठेवली आहे. याचिका कर्त्याच्यावतीने ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव हे काम पाहत आहेत.

# लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी ग्राहक केंद्रावर गर्दी

चौसाळा । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने महिला साठी मुख्य मंत्री माझी लाडकी बहीण ही योजना सुरु केली आहे त्या योजनेच्या अर्ज भरण्यासाठी गावातील ग्राहक केंद्रा वर गर्दी होत आहे तथापि सदर योजनेचे पोर्टल मात्र अध्यापही केंद्रात सुरु झाले नाही शासनाने सम्माधित पोर्टल त्वरित सुरु करावे अशी मागणी नागरिक करतात सदर शासनाची ही लाडकी बहीण योजना सुरु झाल्याने महिला वर्गात समाधान व्यक्त केले जाते सदर योजना सुरू होऊन बरेच दिवस झाले ग्राहक केंद्रात या योजने साठीचे पोर्टल सुरु नसल्याने महिलांची व ग्राहक केंद्रा चालकाची डोके दुकी वाढली असून महिलांना ग्राहक केंद्र चालक उत्तर देताना हतबल होत आहे सदर योजनेचे शासनाने त्वरित पोर्टल सुरु करावे अशी मागणी महिला वर्गातून केली जाते.

# अल्पसंख्याक वडवणी तालुका अध्यक्षपदी फारूक पठाण

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील रहिवासी युवा नेते फारुख भाई पठाण यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट पक्षाच्या अल्पसंख्याक वडवणी तालुका अध्यक्षपदी नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली आहे. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार गट पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख प्रदेश प्रवक्ते श्रीराम बापू मुंडे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष डॉ नदीम शेख. कार्यअध्यक्ष नोमान चाऊस तालुका अध्यक्ष सुरेश दादा भोरे.युवक



वडवणी तालुका अध्यक्ष इम्रान शेख तसेच गावातील इलियास पटेल . निजाम पटेल . फारूक पटेल अतीक पटेल व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.या निवडीमुळे युवा नेते फारुख भाई पठाण यांचे कवडगाव सर्कल सह वडवणी तालुक्यामध्ये अभिनंदन करण्यात येत आहे.

# शेषेराव वागतकर यांना सेवेत हजर करून घेण्याचे मॅटचे आदेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तत्कालीन बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवीनचंद्र रेड्डी यांनी कर्तव्यात कसूर केल्याच्या कारणा वरून १० वर्षा पूर्वी सेवेतून बडतर्फ केलेले पो कॉ शेषेराव वागतकर यांना प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) ने परत सेवेत हजर करून घेण्याचे आदेश दिले असून सेवा निवृत्त पोलीस उपअधीक्षक ॲड ओमप्रकाश माने यांनी चालवलेल्या या खटल्यामुळे पो कॉ वागतकर यांना जो न्याय मिळाला त्या बद्दल ओमप्रकाश माने यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

या विषयी सविस्तर वृत्त असे की, बीड जिल्हा पोलीस दलातील पोलीस कॉन्स्टेबल शेषेराव लक्ष्मण वागतकर ( ब न



१८४८ ) यांना कर्तव्यात कसूर केल्याच्या कारणा वरून साधारण १० वर्षा पूर्वी म्हणजे सन २०१५ साली तत्कालीन पोलीस अधिक्षक श्री नवीनचंद्र रेड्डी यांनी नोकरीतून बडतर्फ केले होते. या बडतर्फीच्या आदेशा विरुद्ध वागतकर यांनी आय. जी, डी जी, गृहसचिव व गृहमंत्री (महाराष्ट्र राज्य यांच्या कडे अपील केले होते मात्र या सर्वांनी त्यांचे अपील फेटाळले. अखेर शेवटचा पर्याय म्हणून वागतकर यांनी सेवा निवृत्त पोलिस उपअधिक्षक ऍड ओमप्रकाश माने यांच्या मार्फत प्रशासकीय न्यायाधिकरण औरंगाबाद येथे केस न ६३७/२०२३ नुसार प्रकारण दाखल केले. या प्रकरणी चाललेल्या खटल्यात मा. मॅटने वागतकर यांना दिलेली शिक्षा ही कसूराच्या प्रमाणात नसून शिक्षा अवाजवी आहे या निर्णया प्रती येऊन जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी बडतर्फीची दिलेली शिक्षा रद्द करून त्यांना कर्तव्यावर हजर करून घ्यावे व अन्य सौम्य स्वरुपाची शिक्षा द्यावी असे आदेश दिले. दरम्यान ऍड ओमप्रकाश माने (मो ९२२६३४२५४८) यांनी पो कॉ वागतकर यांना जो न्याय मिळवून दिला त्या बद्दल माने यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# धनगर समाजाच्या घरकुल योजनेसाठी निधी लवकर वितरित करा-मतकर

बीड । प्रतिनिधी

आज राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना अंतर्गत भटक्या जमाती क वर्ग धनगर समाज बांधवांसाठी घरकुल प्रस्तावास लवकरात लवकर मंजुरी व निधी वितरित करावा कारण की महाराष्ट्र शासनाने लोकसभेच्या आधी धनगर बांधवांचे प्रस्ताव मागितले आहेत पण आज त्याच्यावर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही त्यामुळे राष्ट्रीय



समाज पक्षाच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी साहेब यांना निवेदन देऊन त्यांना या गोष्टीची जाणीव करून दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना अंतर्गत भटक्या जमाती क प्रवर्ग धनगर समाज बांधवांसाठी लाभार्थी घरकुलांचे लाभ देण्यासाठी शासनाने संदर्भ क्रमांक एक व तीनच्या शासन निर्णयानुसार योजना सुरू केलेली आहे सदर योजनेअंतर्गत कुठलीही कारवाई झाली नाही त्यामुळे शासनाने याची दखल घेऊन निधी देवा कारण की धनगर समाजामध्ये गरीब लोक भटकंती करणारे आहेत समाजातील गरीब लोकांसाठी त्या योजनेचा लाभ भेटावा तरी धनगर समाजातील बांधवांना लवकरात लवकर राहण्यासाठी आपण आमचा प्रश्न सोडवावा ही राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने महाराष्ट्र शासनाला व अधिकारी साहेबांना विनंती आहे. प्रा. अण्णासाहेब मतकर, भगवान माने, परशुराम काशीद, शिवाजी चांगन, माऊली मार्कड, बाळासाहेब सापनकर, मोहन खेमाडे आदी उपस्थित होते.

# १३५० गावात राबणार कचरा मोहीम;जिल्हा प्रशासन लागले नियोजनाला

बीड/प्रतिनिधी

जिल्ह्यातील १३५० गावांमध्ये गृहभेटीच्या माध्यमातून अतिसार थांबवा व स्वच्छतेचे दोन रंग ओला हिरवा सुका निळा. या उपक्रमात कुजणारा व नको देणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी प्रत्येक गावामधून पाच संवादक या प्रमाणे जवळपास ६००० संवादकांच्या माध्यमातून जनजागृती करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली आहे. जिल्हा परिषद सभागृहात ग्रीन लीफ पडताळणी बैठक व अतिसार थांबवा अभियान तसेच स्वच्छतेचे दोन रंग या जनजागृती उपक्रम शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संगितादेवी पाटील, उपविभागीय दंडाधिकारी कविता जाधव , प्रमोद कुदळे व तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर गंडाळ , ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर मोकाटे, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांच्यासोबत सर्व गटविकास अधिकारी सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी यांची उपस्थिती होती.

दिनांक ८ जुलै ते ७ ऑगस्ट एक महिना कालावधीत जिल्हयातील प्रत्येक गावात अतिसार थांबवा, स्वच्छतेचे दोन रंग- ओला





हिरवा, सुका निळा या नावाने अभियान राबविण्यात येत आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या उपक्रमातून पिण्याच्या पाण्याचे सर्व स्त्रोत सुरक्षित करण्याची मोहीम याच अभियानामध्ये असल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत राज्य माहे डिसेंबर २०२४ पर्यंत हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करावयाचे आहे. मॉडेल झालेल्या गावात दृष्यमान शाश्वत स्वच्छता ठेवणे आणि हागणदारीमुक्त अधिक झालेली गावे मॉडेल करणे यासाठी विविध विषयाच्या अनुषंगाने गृहभेटीच्या माध्यमातून जनजागृतीसाठी विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक गावात ५ संवादकाची निवड करण्यात येणार असून हे संवादक प्रत्येकाच्या घरी जावून संदेश देणार आहेत. यात सरपंच, उपसरंपच, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामसेवक, आशावर्कर, अंगणवाडी सेविका, स्वच्छाग्रही व बचत गटातील महिलांचा पाणी गुरुदत्त तपासणीतील पाच कुशल महिला जलसुरक्षक यांच्या माध्यमातून अतिसार थांबवा उपक्रमाची जनजागृती व उपायोजना करणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील यांनी दिली आहे.

ओला कचरा हिरव्या रंगाच्या डब्यात ठेवावा. तसेच सुका कचरा निळ्या रंगाच्या डब्यात ठेवण्यासंदर्भात तसेच नियमित शौचालयाचा वापर करणे, शास्त्रयुक्त पध्दतीने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, प्लास्टिक व्यवस्थापन, सुयोग्य मैला गाळ व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालय आणि नियमित वापर आदि बाबत गृहभेटीतून माहिती देण्यात येणार आहे. भेटी दरम्यान गुगल लींकव्दारे भेट दिलेल्या कुटुंबाची फोटोसह माहिती शासनास पाठविणार आहे. असल्याची माहिती पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांनी दिली आहे. गट विकास अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील गावांचे प्रती कुटूंब पाच या प्रमाणे संवादक तयार करुन गृहभेटीचे आयोजन करावे. या कामी तालुक्यातील सर्व अधिकारी, विस्तार अधिकारी यांनी संनियंत्रण करुन अंमलबजावधी करावी. दर आठवडयाला या अभियानाचा जिल्हास्तरावरुन आढावा घेण्यात येणार असल्याची माहिती ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर ज्ञानोबा मोकाटे यांनी दिली आहे. कार्यशाळेत सर्व विषयाचे सादरीकरण श्री संजय मिसाळ व भारत नागरगोजे व अमोल कुलकर्णी यांनी केले. तर कार्यशाळेसाठी आरोग्य व ग्रामपंचायत विभागाचे विस्तार अधिकारी ,बाल विकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे यश



अंबाजोगाई

हरित क्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्ताने भारतीय बंजारा समाज कर्मचारी सेवा संस्था,

अंबाजोगाई च्या वतीने तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे दि.०७/०७/२४ रोजी आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचा संघ सहभागी झाला होता.यात कु.सिध्दी फपाळ(इ.८वी) प्रथम क्रमांक २००१ /- व कु.रोहिणी हाडबे (इ.८ वी) द्वितीय क्रमांक १५०१/-पटकावला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर,कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य रामभाऊ कुलकर्णी, डॉ.कल्पना चौसाळकर, अप्पाराव यादव, वर्षा मुंडे,अविनाश तळणीकर, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजयराव वालवडकर कार्यवाह किरण कोदरकर, शालेय समितीचे अध्यक्ष डॉ अतुल देशपांडे, मुख्याध्यापक तथा केंद्रीयकार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे, शालेय समितीचे सर्व सदस्य, उपमुख्याध्यापक माधव जोशी, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे, पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे, अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे, कल्पना जवळगांवकर, अमरजा कुलकर्णी. तसेच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यांनी अभिनंदन केले आहे.

# मनरेगातुन दहा कोटींची उधळण, एकट्या धोंडराईत तिनशे गायगोठे अन् चारशे विहिरी

## तर पंचायत समिती समोर तंबू ठोकू -अँड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील धोंडराई या गावात गेल्या सोळा महिन्याच्या काळात तीनशे गाय गोठे आणि चारशे विहिरींच्या कामांना मनरेगातून मंजुरी देण्यात आली. यात मोठ्या प्रमाणात खर्चही दाखवण्यात आलेला आहे. मात्र यातील दहा टक्के देखील कामे झालेली नसल्याचे तक्रार जन आंदोलनाला प्राप्त झाली असून मनरेगा अंतर्गत अशीच कामे तालुक्यात चालू असल्याचे दिसते. त्यामुळे जन आंदोलनाने जिल्हाधिकाऱ्यांसह अन्य ठिकाणी या संदर्भात निवेदने दिली असून पंचायत समितीचा बोगस कारभार तात्काळ तपासावा. बिडिओ काय करतात ? हे पाहावे. अन्यथा पंचायत समिती समोर तंबू ठोकू, असा इशारा जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी दिला आहे.

मनरेगा अंतर्गत जिल्हाभरात मोठा निधी खर्च होत आहे. निवडणूक आल्यामुळे जिल्हाभरातील कार्यकर्त्यांना पोचले जात असून बोगस कामांची रेलचेल चालू आहे. त्यामुळे प्रत्येक गावातील जनतेने जागृत होऊन आपल्या गावातील ग्राम पंचायतला कोणकोणत्या योजनेचा निधी येत आहे ? याचा शोध घेऊन खर्चावर आणि कामावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

धोंडराई गावात वीस ते बावीस महिन्यात मनरेगा योजनेतून अडीच कोटी रुपये मजुरांची मजुरी तर सहा कोटी रुपये कुशल कामाची मजुरी वाटप झाली आहे. याशिवाय दर आठवड्याला सतरा लाख रुपये ग्राम पंच्यायतला मनरेगाचा खर्च भागविण्यासाठी येत आहेत. तर गेल्या दोन महिन्यात आणखी सहा कोटींची कामे मनरेगा निधीतून मंजूर झाली आहेत.

धोंडराई येथील तक्रार प्राप्त झाल्यानंतर थोडी फार शहानिशा करून आम्ही पाहिली. त्यावेळी वरील प्रकार दिसून आलेला आहे. या गावात सोळा महिन्यात तीन कोटींच्या वरचा निधी वाटप / खर्च झालेला आहे. केवळ तक्रार प्राप्त झाली म्हणून ही बाब आम्हाला माहीत झाली. मात्र या एका गावाला दोष न देता जिल्हाभरात हाच कारभार चालू आहे. त्यामुळे प्रायोगिक तत्त्वावर या तक्रारीचे शहानिशा होईपर्यंत पंचायत समितीने धोंडराई गावात कोणताही निधी वाटप करू नये, असेही ऍड. देशमुख यांनी म्हटले आहे. केवळ गाय गोठे आणि विहिरींमध्येच हा घोटाळा झालेला नाही. तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर पांदण रस्ते आणि पेवर ब्लॉकची कामे झाल्याचे दाखविण्यात येत आहे. अशी कामे मंजूर झालेली आहेत, अशी ही तक्रार आहे. त्यामुळे मनरेगा अंतर्गत चाललेले धोंडराई येथील जवळपास सर्व कामांमध्ये गैरप्रकार असल्याचे तक्रारीवरून दिसत आहे. रस्ते देखील केवळ दगड आणि वाळू टाकून होत आहेत. केवळ नमुन्या दाखल हे नाव आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना दिले असून याची कसून तपासणी केल्याशिवाय पुढील निधी देऊ नये, अशी मागणी देखील केली आहे.दरम्यान, जिल्हा भरात मनरेगाची कामे अशाच पद्धतीने चालू आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांने आपल्या पंचायत समिती मधून कामांची माहिती घ्यावी. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत मधील कामाची माहिती वेबसाईटवरून काढून घेऊन अभ्यास करावा. आणि येत्या दोन-तीन महिन्यात निवडणुकांपूर्वी होणारी लूट थांबवण्याची आवाहन देखील या देशमुख यांनी केले असून गेवराई पंचायत समितीने यात तात्काळ दखल दिली नाही तर पंचायत समिती समोर तंबू ठोकू, असा इशाराही अँड. अजित देशमुख यांनी दिला आहे.

# लोकनेत्या स्व.डॉ.सौ. विमलताई यांना मुंदडा यांना मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्कार जाहीर

## मान्यवरांच्या उपस्थितीत होणार पुरस्कार वितरण सोहळा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



येथील लोकनेत्या स्व.डॉ.सौ. विमलताई नंदकिशोरजी मुंदडा यांना या वर्षीचा सन - २०२४-२५ यावर्षीचा मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण २१ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता परिचय मंगल कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.अशी माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे,सचिव धनराज सोळंकी यांनी दिली.

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने दर वर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराचे वितरण केले जाते. या वर्षीचा हा रोटरी भूषण पुरस्कार स्व. डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांना मरणोत्तर जाहीर झाला आहे. अंबाजोगाई शहराचे भूषण असलेल्या स्व. डॉ. सौ. विमलताई मुंदडा या परिसराच्या भाग्यविधात्या म्हणून ओळखल्या जातात. डॉ. विमलताई व केज विधानसभा हे जनु काही समीकरणच जुळलें होते.बीड जिल्ह्याच्या राजकारणात एक कर्तृत्ववान महिला सलग पाच वेळा विक्रमी मताधिक्याने निवडून येते. हा वेगळा विक्रम त्यांनी प्रस्थापित केला आहे. सामान्य जनता व विमलताई हे नाते समाजमनात दृढ झाले होते.२४ वर्षे आमदार,व दहा वर्षे मंत्री म्हणुन त्यांनी संपुर्ण महाराष्ट्रात आपली नवी ओळख निर्माण केली होती.कसलाही राजकीय वारसा नसतानाही आपल्या कर्तुत्वावर व जनसेवेच्या माध्यमातून त्यांनी जनतेच्या मनावर अधिराज्य निर्माण केले होते.विकासकार्याच्या माध्यमातुन त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती.ताई या नावाचे वलय त्यांनी निर्माण केले होते.व ते नाते समर्थपणे जपण्याची किमया विमलताईनी साध्य केली होती.

कर्करोगा सारख्या आजाराने त्रस्त असुनही त्यांनी समाजाशी असणारी बांधीलकी कधी तुटु दिली नव्हती.पण या आजारानेच ताईना आपल्यातुन हिरावुन नेले.परंतु ताईनी गेल्या २४ वर्षात आरोग्यमंत्री, बांधकाममंत्री, राज्यमंत्री,आमदार, म्हणुन केलेली अनेक कामे आजही त्यांची आठवण करुण देतात.या भागाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान कधीच विसरता येणार नाही.त्यांच्या कार्याची दखल घेऊन रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने त्यांना मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्कार जाहीर केला आहे.

# बीडमधील चोरीच्या घटना वाढल्या, नागरिक भयभीत

## तातडीने उपाययोजना करण्याची आ.क्षीरसागरांनी केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरासह ग्रामीण भागात चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. गेल्या महिनाभरात अनेक ठिकाणी चोरीच्या घटना घडल्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. पोलिस प्रशासनाने याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

गेल्या महिनाभरापासून बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड शहर, बीड तालुका, शिरूर-कासार तालुका आणि सर्व बीड जिल्ह्यातून चोरीच्या घटनांच्या बातम्या येत आहेत. अनेक वेळा पाळत ठेवून व अचानक होणार्या चोरीच्या घटनांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. त्यामुळे नागरिक अत्यंत भयभीत झाले आहेत. बर्याच ठिकाणी नागरिक एकत्र येऊन गस्त घालत आहेत. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून यावर पोलीस प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात व नागरिकांना संरक्षण देण्याची हमी द्यावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. याबाबत आ.क्षीरसागर यांनी बीडचे पोलीस अधीक्षक यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

# शिवराज उगले यांच्याकडे पुणे ग्रामीण युवक जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी




**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांच्या सामाजिक कार्याचा वसा पुणे ग्रामीण येथे सक्षमपणे राबवणारे बीड जिल्ह्यातील हाजीपुर येथील रहिवाशी शिवसंग्रामचे युवा नेते शिवराज उगले यांची शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी पुणे ग्रामीण युवक जिल्हाध्यक्षपदी निवड जाहीर केली. या निमित्ताने शिवसंग्राम परिवाराच्या वतीने यथोचित सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.




बीड : माजी खासदार प्रथम नगराध्यक्ष द्वारकादास मंत्री यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करताना माजी सभापती नवनाथ शिराळे पाटील...



बीड : शहराचे प्रथम नगराध्यक्ष तथा माजी खासदार स्व.द्वारकदास मंत्री यांच्या स्मृतिदिनानिमित्त बीड नगरपरिषद येथे अभिवादन कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी उपस्थित राहून अभिवादन केले. यावेळी माजी आ.राजेंद्र जगताप, सिराज देशमुख, माजी राज्यमंत्री प्रा.सुरेश नवले, वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी सभापती प्रा.किशोर काळे, महादेव धांडे, नितिन मंत्री, रघु मंत्री आदी उपस्थित होते.

# तीन दशकानंतरही पायाभूत सुविधांच्या प्रतिक्षेत, उद्योजकांची होतेय गैरसोय

**आष्टी । प्रतिनिधी**



शहराजवळ औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) उभा राहून तीन दशकांचा काळ लोटला तरी या ठिकाणी रस्ते, पाणी, वीजेसारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. यामुळे उद्योजकांचे उद्योग सुरू करण्याचे धारिष्ट होत नसून सुरू असलेल्या तीन ते चार कंपन्यांच्या उद्योजकांनाही मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

ऊसतोड कामगारांचा तालुका अशी ओळख असलेल्या आष्टी तालुक्यातील तरुणांना तालुक्यातच रोजगारनिर्मितीची व्हावी या हेतुने १९९५मध्ये महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून १५ हेक्टर जागा आरक्षित करून या क्षेत्रामध्ये औद्योगिक वसाहतीची निर्मिती करण्यात ◀◀ पान ३ वर

# अशोक येडे यांच्या वाढदिवसानिमित्त मिलिया प्रायमरी स्कूल येथे शालेय साहित्य वाटप



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्ह्याचे शहराध्यक्ष सय्यद सादेक यांच्या वतीने तेलगाव नागा येथील मिलिया प्रायमरी स्कूल तेलगाव नाका बीड येथे तेथील गरजवंत विद्यार्थ्यांना वही पेन व शालेय साहित्य वाटप करण्यात आले यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हा सचिव रामधन जमाले तालुका उपाध्यक्ष आजम खान रामभाऊ शेरकर अल्पसंख्याक विभागाचे विभाग प्रमुख रफिक पठाण शाळेतील गरजवंत विद्यार्थी मुख्याध्यापक साहेब व सर्व शिक्षक उपस्थित होते.

# बंद पडलेली जिल्हा परिषद शाळा गावकऱ्यांसह शिक्षकांनी केली पुन्हा सुरू

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषद शाळा शिक्षण विभागानं बंद केल्याचं पाहायला मिळत आहे. बीड जिल्हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात सुमारे पाच ते सहा लाख लोक ऊसतोडणी कामगार म्हणून जिल्ह्याबाहेर ऊस तोडण्यासाठी जातात. ऊसतोड कामगार आपल्या पाल्यांनाही सोबत घेतात. त्यामुळं त्यांच्या मुलांचं शिक्षण कायमचं बंद होतं.

गावकऱ्यांसह शिक्षकाची प्रतिक्रिया

कारेगव्हाण शाळेचं पुनरुज्जीवन : विद्यार्थी नसल्यामुळं जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होते. पर्यायानं त्या ठिकाणची शाळा बंद करण्याची वेळ शिक्षण विभागावर येते. मात्र, गावातील शाळा बंद होवू, नये यासाठी बीडमधील कारेगव्हाण गावातील नागरिकांसह शिक्षकांनी शाळेचं पुनरुज्जीवन केलंय.




त्यामुळं गावातील ऊसतोड मजुरांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची गावातच सुविधा उपलब्ध झालीय. याबाबत विद्यार्थ्यांच्या पालकांनी समाधान व्यक्त केलं असून आमच्या मुलांना गावात चांगलं शिक्षण मिळत असल्याची प्रतिक्रिया इटीव्ही भारतशी बोलताना दिली आहे.

गावातील शाळेबाबत लोक समाधानी : ''गावातील शाळा चांगली नव्हती, शिक्षक चांगले नव्हते. त्यामुळं मुलं हुशार नव्हती. आम्ही मुलांना बाहेर गावी शिक्षणासाठी पाठवलं होतं. मात्र, आता

### शाळेनं पटकवला प्रथम क्रमांक

गावातच चांगली शाळा झाल्यामुळं मुलांवर होणारा खर्च वाचलाय. त्यामुळं आता आम्ही समाधानी आहोत. शासनातर्फे ऊसतोड मजुरांसाठी चालवलेलं वसतीगृहही याच ठिकाणी सुरू आहे. मुलांच्या जेवणाची, शिक्षणाचीही व्यवस्था केली जातेय. त्यामुळं आम्हाला कोणतीही चिंता नसून आम्ही समाधानी आहोत'', असं पालक रेखाल आंधाळे यांनी म्हटलं आहे.

शाळेचा खर्च वाचला : ''आता आमच्या गावची शाळा चांगली आहे, म्हणून आम्ही मुलांना या शाळेत पाठवलं आहे. आम्हाला ऊस तोडायला जायचंय म्हणून आम्ही सर्व गावकऱ्यांनी विचार करून गावातील शाळा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. गावातील जिल्हा परिषद शाळा पुन्हा सुरू झाली. ज्या मुलांना गावाबाहेर शाळेत पाठवलं आहे, ती परत गावाकडं येत आहेत. ऊस तोडणीसाठी आम्हाला सहा महिने बाहेर जावं लागतं. त्यामुळं आम्ही मुलांवर पैसेही खर्च करत होतो, पण आता गावात शाळा असल्यानं आमचा खर्चही वाचला आहे. मी देखील या शाळेत शिकलो आहे. त्यामुळं आमची शाळा चांगली असल्याचं माला समाधान आहे'', अशी प्रतिक्रिया महादेव खंडारे यांनी दिली आहे.

''मी या शाळेत पहिली ते पाचवीपर्यंत शिक्षण घेतलंय. या ठिकाणी एक शाळा होती, ती चांगली नव्हती. येथील शिक्षक देखील चांगले शिकवत नव्हते. तसंच संपूर्ण शाळा जीर्ण झाली होती. शाळेच्या आजूबाजूलाही अतिक्रमण झालं होतं. मात्र आता अतिक्रमण हटवलं असून वर्गही सुरू झाले आहेत. त्यामुळे पालकांचाही आत्मविश्वास वाढला आहे. मुलाचा वर्षाकाठी होणारा वीस ते पंचवीस हजार रुपयांचा खर्च आम्ही वाचवला आहे. आम्ही आमच्या गावात राहून गावातच मोफत शिक्षण घेतोय. आम्ही सर्व ग्रामस्थांनी आमच्या गावात पहिली ते दहावीपर्यंतची जिल्हा परिषद शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे''. - बालाजी खंदारे, नागरिक

गावात ९०% ऊसतोड कामगार : कारेगव्हाण जिल्हा परिषद शाळेची स्थापना १९५९ मध्ये झाली होती. पहिली ते चौथीपर्यंत गावातंच शिक्षण मिळत होतं. पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना नेकनूरला जाव लागत होतं. या गावात ९०% ऊसतोड कामगार आहेत. त्यामुळं त्यांच्या मुलांच्या शिक्षणांचा प्रश्न गंभीर बनला होता. मात्र, आता गावात चांगली शाळा नसल्यानं सोलापूर, सातारा, बीड, अहमदनगरमध्ये लोक आपल्या मुलांना पाठवायचे. मात्र आता गावातीलच ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सर्वसामान्यांना अपमानास्पद वागणूक देणं भोवलं; पुण्यातील तहसीलदाराचं थेट निलंबन, १० दिवसांत आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील खेडच्या तहसिलदारांना सर्वसामान्यांना अपमानकारक वागणूक देण्यासह इतर गंभीर आरोपांखाली निलंबीत करण्यात आलं आहे. पुण्यातील खेड येथील तहसीलदार प्रशांत बेडसे ( डीशिपीळेप`ष झींपिश ढरहीळश्रवरी) यांच्यावर विभागीय चौकशीनंतर १० दिवसात निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. शासनाची प्रतीमा मलीन केल्याचा ठपका ठेवत निलंबनाची कारवाई करण्यात आली असून विभागीय चौकशीनंतर अवघ्या १० दिवसात निलंबनाचे आदेश देण्यात आले आहेत.




सोलापूर जिल्ह्यात मोहोळचे तहसीलदार असताना कोरोना नियमांचे उल्लंघन करणे, तसेच त्याच काळात सर्वसामान्यांसह वकिलांना अपमानास्पद वागणूक दिल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या कृतीने शासनाची प्रतिमा मलीन झाल्याचा पुण्यातील खेड तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या विरोधात आलेल्या तक्रारी गंभीर असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार त्यांच्यावर चौकशीचे आदेश देण्यात आले होते. याप्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांचीही नेमणूक करण्यात आली होती. यानंतर विभागीय चौकशीच्या अनुषंगाने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

निलंबन कालावधीत तहसीलदार प्रशांत बेडसे यांना पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयाचे मुख्यालय सोडता येणार नसल्याचे आदेशात म्हटले आहे. पुण्यातील पूजा खेडकर प्रकरण प्रसारमाध्यमांपासून समाजमाध्यमांपर्यंत गाजत असताना पुन्हा एकदा सनदी अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# धक्कादायक! पुण्यात आर.टी.ओ.अधिकाऱ्यानेच दोघांना उडवले; उपचाराचा खर्च देतो म्हणत आता हात झटकले

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील अपघातांची मालिका काही गेल्या संपता संपत नाही. कधी बड्या बापांची पोरं सर्वसामान्यांना दारुच्या नशेत उडवतात. तर, कधी प्रशासकीय खुर्चीवर बसलेल्या अधिकाऱ्यांच्या डोक्यातही आपल्या खुर्चीची हवा दिसून येते. कल्याणीनगर येथील पोर्शे कार अपघात प्रकरणामुळे पुणे पोलीस खडबडून जागे झाले आहे. वाहतूक व्यवस्था आणि मद्य पिऊन गाडी चालवणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जात आहे. मात्र, एका आरटीओ अधिकाऱ्यानेच दुचाकीला धडक देऊन केलल्या अपघातात अद्यापही कारवाई न झाल्यानंतर अपघातातील जखमींकडून संताप व्यक्त होत आहे.

पुणे सोलापूर महामार्गावर विरुद्ध दिशेने जाणाऱ्या एका चारचाकी गाडीने दुचाकीला धडक देऊन भीषण अपघाताची घटना घडली होती. वरळीतील हिट अँड रन प्रकरण देशभरात चर्चेत असतानाच, हवेली तालुक्यातील कुंजीरवाडी हद्दीत प्रादेशिक परिवहन विभागाच्या एका वरीष्ठ अधिकाऱ्याने चुकीच्या दिशेने भरधाव वेगात गाडी चालवून दुचाकीला धडक दिल्याचा धक्कादायक प्रकार समोरा आला आहे. कुंजीरवाडी गावातील चौकात बुधवारी ३ जुलै रोजी हा अपघात घडला असून या अपघाताचे ललींीं फुटेज समोर आले आहे. संभाजी गावडे असं प्रादेशिक परिवहन विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्याचे नाव असून निखिल पवार आणि विकास राठोड असे अपघातात जखमी झालेल्या दोन तरुणांची नावे आहेत.




विशेष बाब म्हणजे संभाजी गावडे यांनी दोन्ही जखमींच्या नातेवाईकांना उपचाराचा खर्च देण्याचे आमिष दाखवून, अपघाताचा गुन्हा लोणी काळभोर पोलिस ठाण्यात दाखल होऊ दिला नव्हता. मात्र , दोन्ही रुग्णांच्या शस्त्रक्रियांचा खर्च देण्यास साहेबांनी ऐनवेळी हात वर केल्याने, दोन्ही रुग्णांना उपचार संपल्यावरही मागील तीन दिवसापासुन रुग्णालयातच खितपत पडावे लागल्याची गंभीर बाब पुढे आली आहे. सत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त ज्या दिवशी काही रस्ते बंद होते त्याच दिवशी हा अपघात घडल्याची माहिती आहे. संबंधित आर.टी.ओ. आधिकारी हे उरुळी कांचनच्या दिशेने जात असताना हा अपघात घडला. आरटीओ अधिकारी विरुद्ध दिशेने भरधाव वेगाने जात असताना समोरुन आलेल्या दुचाकीला या गाडीने जोरात धडक दिली होती. त्यामध्ये, निखिल पवार व विकास राठोड हे दोघेही जखमी झाले आहेत.

# जिंकणं, पराभूत होणं हे निवडणुकीत ठरलेलं समीकरण'! माळेगावात सुनेत्रा पवारांनी मानले भाजप नेत्यांचे आभार

**माळेगाव । प्रतिनिधी**

जिंकणे, पराभूत होणे हे निवडणुकीत ठरलेले समीकरण आहे. परंतु, निवडणुकीनंतर अपयश आले तरी ज्या मतदारांनी, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी प्रचाराची धुरा संभाळली, त्यांना भेटणे आणि त्यांचे आभार मानणे हा संस्काराचा भाग असतो. अशाच पद्धतीचा प्रत्येय आज लोकसभेला पराभूत झालेल्या, परंतु राज्यसभेवर बिनविरोध खासदार झालेल्या सुनेत्रा पवार यांच्या माळेगावातील गाठीभेटीतून दिसून आला.



भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रराव तावरे, माळेगावचे माजी अध्यक्ष रंजन तावरे, जाधवराव परिवारासह अनेक पदाधिकाऱ्यांची सुनेत्रा पवार यांनी माळेगावात येऊन आभार मानले. पवार यांची ही भूमिका आगामी काळात तालुक्याच्या राजकारणाला पोषक ठरणार असल्याचे मानले जाते.

बारामती तालुक्यात भाजपचे नेते चंद्रराव तावरे (सांगवी), माळेगावचे माजी अध्यक्ष रंजन तावरे आदी भाजपच्या नेते मंडळींनी लोकसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या त्यावेळच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांची प्रचाराची धुरा संभाळली होती. प्रचार प्रक्रियेत त्यांनी काम केले होते. त्या पार्श्वभूमीवर गुरूवारी माळेगावात शरद संकूलमध्ये सुनेत्रा पवार यांनी संबंधित पदाधिकाऱ्यांची भेट घेतली व आभार मानले.

यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष पी. के. जगताप, माळेगाव कारखान्याचे संचालक ॲड. जी. बी. गावडे, माजी संचालक शशिकांत कोकरे, चिंतामणी नवले, राजेंद्र देवकाते, शशिकांत तावरे, संग्राम काटे, चेतन (बाबा) जगताप, अभिजित कोकरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी संबंधित पदाधिकाऱ्यांमध्ये माळेगाव कारखान्यातील सध्याच्या घडामोडींवर मुख्यत्वे चर्चा झाली. ५ लाख लिटर क्षमतेचा इथेनॉल प्रकल्प होणे, कामगार भरतीमध्ये सर्वांना न्याय मिळावा आदी प्रमुख मुद्यांचा वरील चर्चेत समावेश असल्याचे सांगण्यात आले. हे प्रश्न सोडविण्यासाठी अजितदादांना लक्ष घालण्याची मी स्वतः विनंती करणार आहे, अशी ग्वाही सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले. दरम्यान, ऋऋमाळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत जरी आम्ही परस्परविरोधी काम करीत असलो, तरी आता राजकीय दृष्ट्या समीकरण बदली आहेत. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना आदी मित्र पक्ष एकत्र आले आहेत. त्यावेळी बारामतीमधील परस्परविरोधी काम करणारे मुख्यतः भाजप व राष्ट्रवादी पक्षातील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचा समेट घालण्यासाठी खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला होता. त्या बैठकीला खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. त्यावेळीही स्थानिक राजकारण व असणारे प्रश्न सामोपचाराने सोडविले जातील, अशी ग्वाही त्यावेळी संबंधित मंत्रीमहोदयांनी दिली होती. त्या प्रसंगाची आठवण चंद्रराव तावरे, रंजन तावरे यांनी पवार यांना करून दिली.

# ड्रंकन ड्राईव्हमध्ये १६८४ परवाने निलबित करण्याचा प्रस्ताव

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात दिवसेंदिवस अपघातांच्या घटना वाढत असून, यामध्ये दारू पिऊन वाहन चालवून धडक दिल्याने बहुतांश घटनांची नोंद झाली आहे. त्यातच कल्याणीनगर येथील अपघात, नुकताच मद्यपी चालकाने भरधाव वेगात वाहन चालवून गस्तीवर असलेल्या पोलिसांना दिलेली धडक आणि एका मद्यपी चालकाने कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवर पेट्रोल ओतून त्यांना जाळण्याचा प्रयत्न केला होता.

त्याच धर्तीवर आता पोलिसांकडून १ जानेवारी ते ३० जूनदरम्यान ड्रंकन ड्राईव्ह करणाऱ्यांचे चालढकल संपली, तब्बल १ हजार ६८४ प्रकरणे परवाना निलंबित करण्यासाठी पाठवले आहेत. याबाबत दैनिक 'पुढारी'ने 'चालढकल संपली; दारू प्यायल्यास परवाना रद्द' या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर आता परवाने निलंबित करण्याच्या कारवाईला वेग आल्याचे दिसत आहे. पुणे शहरातील वाहनचालकांनी नियम पाळावेत यासाठी वाहतूक शाखेकडून विशेष कारवाई करण्यात येत आहे. शहरातील महत्त्वाच्या चौकांमध्ये होणाऱ्या अपघातांवर अंकुश लावण्याकरिता नाकाबंदी केली होती. २१ मे २०२४ ते ८ जुलैदरम्यान विविध प्रकारच्या वाहतूक नियम भंगाच्या १ लाख ५८ हजार २६९ कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये तब्बल १२ कोटी २१ लाख ९३ हजारांचा दंड वसूल केला. यामध्ये ड्रंकन ड्राईव्हप्रकरणी १ हजार २३२ चालकांवर कारवाई केली आहे. १ जानेवारी २०२४ ते दि. ३० जून २०२४ दरम्यान १ हजार ६८४ मद्यपी चालकांवर ड्रंकन ड्राईव्हची कारवाई केली असून, त्यांचे परवाने निलंबित करण्यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे.

# मुस्लिम महिलांना पोटगी मिळण्याचा अधिकार, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचं मुस्लिम सत्यशोधक मंडळाकडून स्वागत

**पुणे । प्रतिनिधी**

शहाबानो प्रकरणानंतर 'मुस्लीम महिला (घटस्फोटावरील अधिकारांचे संरक्षण) कायदा १९८६' हा सर्वसमावेशक आणि धर्मनिरपेक्ष फौजदारी संहिता कलम १२५ पेक्षा वरचढ असू शकत नाही. हा कायदा सर्वसमावेशक असून मुस्लीम महिलांनाही लागू होणारा आहे आणि पोटगी हे दानकर्म नसून घटस्फोटीत महिलांचा अधिकार आहे असा निवाडा बुधवारी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला. त्याचं स्वागत मुस्लिम सत्यशोधक मंडळाने केलं आहे. या निर्णयामुळे समान नागरी कायद्याचा दृष्टीने सकारात्मक वातावरण निर्माण होईल असं मतही मुस्लिम सत्यशोधत मंडळानं व्यक्त केलं आहे.



शहाबानो प्रकरणानंतर १९८६ मध्ये अस्तित्वात आलेल्या कायद्यास पर्याय म्हणून ऐच्छिक स्वरूपात कलम १२५ चा आधार घेऊन अनेक मुस्लीम महिलांनी पोटगीविषयक न्यायालयीन लढा जिंकला. तसेच २००९ मध्ये शबानाबानो विरूध्द इम्रान खान खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने कौटुंबिक न्यायालयातून मुस्लीम महिलांना फौजदारी १२५ कलमानुसार पोटगी मागण्याचा अधिकार असल्याचे अधोरेखित केले होते.

पोटगीच्या १२५ कलमानुसार मुस्लिम महिलांनाही पोटगी मिळवता येते. यासंदर्भात अनेकांमध्ये संदिग्धता आणि गोंधळाची परिस्थिती होती. ही परिस्थिती दूर करण्याचे महत्त्वाचे कार्य सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या निवाड्यामुळे झाले आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळ मुस्लिम महिलांच्या संविधानात्मक अधिकारासाठी लढा देत आहे.

मुस्लिम महिलांच्या एकूणच प्रश्नांच्या निवारणासाठी समतेवर आधारित समान नागरी कायदा अस्तित्वात येणे आवश्यक आहे. या निवाड्याच्या निमित्ताने समान नागरी कायद्याच्या दृष्टीने सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल असे मंडळास वाटते. या पार्श्वभूमीवर मुस्लिम महिला पोटगी संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे मुस्लिम सत्यशोधक मंडळाकडून स्वागत करण्यात येत आहे

## जीवितहानीच्या घटना टाळण्यासाठी मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे- जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे

**पुणे । प्रतिनिधी**

शेततळ्यांमध्ये पडून जीवितहानीच्या घटना टाळण्यासाठी कृषी विभागातर्फे मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या असून त्यांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे.

प्रत्येक शेततळ्यामध्ये त्याच्या आकारमानानुसार जलतरण तलावात वापरण्यात येणाऱ्या ट्युब ठेवाव्यात. शेततळ्याच्या चहुबाजूंनी गाठी मारलेले दोरखंड ठेवण्यात यावेत. शेततळ्यांमध्ये दोरखंडाची चौकोनी जाळी प्लॅस्टिक कागदाच्या उतारावर लावण्यात यावी. शेततळ्याच्या वरील चारही बाजूंना लाईफ जॅकेट बसविण्यात यावे. शेतकऱ्यांनी शेततळ्याला कुंपण करून घ्यावे, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

# 'हे आयएएस अधिकारी सिस्टीममधील कलंक, त्यांना सस्पेंड केलं पाहिजे'; पूजा खेडकरांच्या बदलीवरून रवींद्र धंगेकर संतापले!

**पुणे । प्रतिनिधी**

ट्रेनी आयएएस असताना स्वतःच्या ऑडी गाडीवर अंबर दिवा लावून चमकोगिरी केल्याप्रकरणी पूजा खेडकर या चर्चेत आल्या आहेत. तसेच होम डिस्ट्रिक्टमध्ये ट्रेनी कार्यकाळ सुरू असताना त्यांनी निवासी जिल्हाधिकाऱ्यांचे केबीनही बळकावली होती. आता पूजा खेडकरांची वाशिम (थरीहळा) येथे बदली करण्यात आली आहे. यावरून काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर यांनी तोफ डागली आहे.



गेल्या दोन दिवसांपासून पूजा खेडकर यांचे उत्पन्न, श्रीमंत थाट ते त्या सनदी अधिकारी होण्यास कशाप्रकारे पात्र नव्हत्या, याबाबत जोरदार चर्चा सुरु आहे. पूजा खेडकर या महाराष्ट्र केडरच्या २०२२ च्या बॅचमधील ख-ड अधिकारी आहेत. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांची पुण्यात प्रोबेशनरी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली होती. या काळात पूजा खेडकर या स्वत:च्या खासगी ऑडी गाडीवर लाल-निळा दिवा आणि महाराष्ट्र शासन अशी नेमप्लेट लावून फिरायच्या. याशिवाय, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याचे अँटी चेंबर बळकावून पूजा खेडकर यांनी तिकडे स्वत:चे कार्यालय थाटले होते. आता पूजा खेडकर यांची वाशीममध्ये बदली करण्यात आली असून यावरून रवींद्र धंगेकर यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

बदली होऊन काही होणार नाही, सस्पेंड केलं पाहिजे : रवींद्र धंगेकर

रवींद्र धंगेकर म्हणाले की, हे असे आयएएस अधिकारी सिस्टीममधले कलंक आहेत. या अधिकाऱ्यांची बदली होऊन काही होणार नाही. त्यांना सस्पेंड केलं पाहिजे. या अधिकाऱ्यांच्या वडिलांनी तिचे बोगस सर्टिफिकेट बनवले. तिचे सर्टिफिकेट, मेडिकल सर्टिफिकेट या सगळ्याची तपासणी व्हायला हवी. घरातूनच तिला असे संस्कार मिळाले आणि त्यामुळे तिची वर्तणूक सुद्धा तशीच दिसत आहे. सिस्टीममध्ये अशा एकच पूजा खेडकर नाहीत, इतरही आहेत. पण यांच्यावर कठोर कारवाई केली. तरच सिस्टीम योग्य दिशेने जाईल. एक प्रकारे मुजोरी करणारे हे अधिकारी आहेत, अशी टीका त्यांनी यावेळी केली आहे.

काय म्हणाल्या पूजा खेडकर ?

आज पहिल्यांदाच पूजा खेडकर यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, मला सध्या काहीही बोलण्याची परवानगी नाही. मला वाशिममध्ये रुजू होताना आनंद होतोय, इथून पुढेही मला वाशिममध्ये काम करायला आवडेल. मला सरकारने काहीही बोलण्यासाठी परवानगी दिलेली नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

# तृतीयपंथीयांनी ब्रॅण्ड म्बेसेडर नियुक्तीसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

समाज कल्याण विभागामार्फत मागासवर्गीयांसाठी, पारलिंगी व तृतीयपंथी नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी पारलिंगी तथा तृतीयपंथी व्यक्तींची ब्रॅण्ड म्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात येणार असून इच्छुक तृतीयपंथीय नागरिकांनी अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ब्रॅण्ड म्बेसेडरच्या नियुक्तीसाठी इच्छुक पारलिंगी, तृतीयपंथी व्यक्तींनी आपली वैयक्तिक माहिती, छायाचित्र, अभिनयाचे व्हिडीओ आणि आवश्यक कागदपत्रासह सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विश्रांतवाडी पोलीस ठाण्यासमोर, येरवडा, पुणे ६ येथील कार्यालयात उपस्थित राहून अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले आहे.

# पुण्यातील तरुण अमेरिकेत बेपत्ता

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील सिद्धांत पाटील हा तरुण मागील सहा दिवसांपासून अमेरिकेत बेपत्ता झाला आहे. अमेरिकेमधील नदीत चेहरा धूत असताना पाय घसरून तो नदीत पडला होता अशी माहिती सिद्धांतसोबत असलेल्या मित्रांनी सिद्धांतच्या वडिलांना दिली आहे. या घटनेमुळे सिद्धांतच्या कुटुंबात घालमेल सुरु आहे. मुलाचा शोध घ्या असे पत्र जेष्ठ नेते शरद पवार केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी लिहिले आहे.

मुळचा जळगावचा असलेल्या सिद्धांतचे कुटुंब पुण्यातल्या पिंपळे निलखमध्ये स्थायिक झाले आहे. सिद्धांत त्याच्या आई-वडिलांसाठी एकुलता एक. तो २०२१ साली अमेरिकेत पुढील शिक्षणासाठी गेला. मिळालेल्या माहितीनुसार, ६ जुलै ला ( शनिवारी ) तो त्याच्या मित्रांसोबत ट्रेकिंगला गेला. ट्रेकिंग दरम्यान पाय घसरून तो नदीत पडला. सहा दिवस उलटले तरीही याबाबत काहीही माहिती मिळाली नाही.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जेष्ठ नेते शरद पवार यांनी देखील केंद्र सरकारला याबाबत पत्र लिहिलं आहे. सिद्धांतचा शोध घेण्यात अमेरिकन प्रशासन दिरंगाई करत आहे, असा आरोप त्याच्या आई-वडिलांनी केला आहे. सिद्धांतचे वडील विठ्ठल पाटील यांनी या प्रकरणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साकडं घातलं आहे. पंतप्रधानांनी या प्रकरणात लक्ष घालून लवकरात लवकर माझ्या मुलाचा शोध घ्यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

# पालखी मार्गावर 'आई' योजनेची चित्ररथाच्या माध्यमातून प्रसिद्धी

**पुणे । प्रतिनिधी**

पर्यटन क्षेत्रात महिलांमध्ये उद्योजकता व नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी राज्यशासनामार्फत सुरू करण्यात आलेल्या 'आई' योजनेची प्रसिद्धी पर्यटन संचालनालयामार्फत एलईडी चित्ररथाच्या माध्यमातून पालखी मार्गावर करण्यात येत आहे. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळयात हा चित्ररथ चालविण्यात येत आहे.

पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील यांच्या संकल्पनेतून चित्ररथ तयार करण्यात आला आहे. विभागीय कार्यालयापासून उपसंचालिका शमा पवार आणि पर्यटन संचालनालयाच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत लोणंदपासून उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला असून पंढरपूरपर्यंत योजनेची माहिती देण्यात येणार आहे.

पर्यटन विभागाच्यावतीने जून २०२३ पासून 'आई' योजना सुरू करण्यात आली आहे. पर्यटन क्षेत्रात महिलांमध्ये उद्योजकता व नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी पर्यटन व्यवसाय हा पर्यटन संचालनालयाकडे व्यवसायासाठी नोंदणीकृत असला पाहिजे. हा व्यवसाय महिलांच्या मालकीचा व त्यांनी चालवलेला असावा. हॉटेल, रेस्टॉरन्ट्सची मालकी ही महिलांची आणि ५० टक्के व्यवस्थापकीय इतर कर्मचारी महिला असणे आवश्यक आहे. टूर आणि ट्रॅव्हल्स एजन्सीमध्ये ५० टक्के कर्मचारी महिला असणे आवश्यक असून पर्यटन व्यवसायाकरिता आवश्यक सर्व परवानगी प्राप्त असावी.

पर्यटन क्षेत्राशी निगडित असलेले ४१ प्रकारचे व्यवसाय, उद्योग सुरू करण्यासाठी या योजनेअंतर्गत पर्यटन विभाग महिलांना १५ लाखापर्यंतचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देणार आहे. बँकांमार्फत उपलब्ध करून दिलेल्या या कर्जाच्या १२ टक्क्यांपर्यंतच्या व्याजाचे हप्ते पर्यटन संचालनालयाकडून दिले जाणार आहेत. महिला उद्योजकता विकास, पायाभूत सुविधा, पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य, महिला पर्यटकांसाठी उपयुक्त उत्पादने वा सवलती, प्रवास आणि पर्यटन विकास ही आई योजनेतील महिलांसाठीच्या पर्यटन धोरणाची पंचसूत्री आहे. महिला अर्जदारांना पर्यटन संचालनालयाच्या https://maharashtratourism.gov.in अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करणे बंधनकारक आहे. सद्यस्थितीत या योजनेंतर्गत पुणे विभागामध्ये ४८ अर्ज, अमरावती १७, नागपूर १२, कोकण २५, नाशिक १२ व संभाजीनगरमध्ये ७१ अर्ज प्राप्त झालेले असून त्यामध्ये अर्जदारांना पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. या क्षेत्रांत व्यवसाय करणाऱ्या किंवा नव्याने व्यवसाय सुरू करण्यास इच्छुक असणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन पर्यटन संचालानयामार्फत करण्यात आले आहे.



अधिक माहितीसाठी पर्यटन संचालनालयाच्या पुणे विभागीय कार्यालयाशी उपसंचालक कार्यालय, विभागीय पर्यटन कार्यालय, एमटीडीसी कार्यालय, आय बरॅक, मध्यवर्ती इमारत पुणे ४११ ००१ दूरध्वनी क्र. ०२०-२९९००२८९/८०८००३५१३४ ईमेल - ddtourism.pune-mhgov.in वर संपर्क साधावा, असे आवाहन उपसंचालक शमा पवार यांनी केले आहे.